नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १७३ * * अमरावती * शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## जवानांना सोशल मीडिया वापरण्याची परवानगी

■ **वृत्तसंस्था, चित्रदुर्ग, दि. २५ :**
भारतीय लष्कराने जवानांच्या सोशल मीडिया ॲप्सच्या वापराबाबत नवीन धोरण जारी केले आहे. इंस्टाग्रामवर रील्स, फोटो आणि व्हिडिओ पाहता येतील, मात्र कमेंट करण्याची परवानगी नाही.

व्हॉट्सॲप, टेलिग्रामसारख्या ॲप्सवर गोपनीय नसलेली माहिती शेअर करता येईल. याशिवाय, यूट्यूब आणि इतर काही ॲपचा वापर केवळ माहितीसाठी केला जाईल. तसेच, लिंक्डइन, स्काईप आणि सिग्नल ॲपसाठीही नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. भारतीय लष्कराने गेल्या महिन्यात नवीन कोट कॉम्बॅटच्या डिझाइनचे (डिजिटल प्रिंट) पेटंट घेतले होते.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## दुसरी पिढी आणि तिसरी पिढी

काल नागपूर जवळ एका मोठ्या घराण्याच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीत म्हणजे काका पुतण्या या दोघांमध्ये वादावादी झाली. पुतण्यांनी काकांना फावड्याने मार-मार मारले, त्यानंतर पुन्हा मारामारी झाली आणि मग म्हाता?या काकांनी सरळसरळ घरात जाऊन बंदूक काढली आणि आपल्या दोन्ही पुतण्यांवर गोळीबार केला. काका आधीच जखमी झाले होते. गोळीबारात पुतण्याच्याही पोटात गोळी लागली होती. दोन्ही पुतणे सध्या गंभीर आहेत. एका लहानशा गोष्टीवरून सूडाग्नि पेटला म्हणजे कसे जीवघेणे हल्ले होतात, याचा हा जिवंत पुरावा आहे. आपले घराणे आणि आपली भाऊबंदकी यांच्यातील ही लढाई नवीन नाही. मराठ्यांचा इतिहास पाहिला तर राघोबादादा समोरच गारद्यांनी त्यांच्या पुतण्याला ठार मारले. नारायण नावाचा लहानसा मुलगा, 'काका मला वाचवा काका मला वाचवा' असे म्हणून राघोबा दादांच्या समोर रडत होता पण काकांना त्या क्षणी अजिबात दया आली नाही. अशा प्रकारचे दुसऱ्या पिढीचे संबंध आणि तिस?या पिढीतील परस्पर संबंध त्यातूनच वैर निर्माण होणे हे काही नवीन नाही. त्यासाठी आपण काही आधुनिक काळातील उदाहरणे बघूया. स्वर्गीय पंतप्रधान इंदिराजी गांधी यांचे दोन सुपुत्र होते त्यापैकी एक म्हणजे संजय गांधी राजकारणात सक्रिय होते तर त्यांचेच भाऊ राजीव गांधी वैमानिक होते. संजय गांधी यांचे अपघाती निधन झाले आणि काही दिवसातच आपल्या लहानशा लेकराला घेऊन संजय गांधी यांच्या पत्नी मनेका गांधी छोट्याशा वरुणसह घराबाहेर पडल्या. एक मोठे घराणे दुभंगले त्यांचे अजूनही मनोमिलन झालेले नाही. आपले गोविंदराव पवार यांचे एक पुत्र शरदचंद्र पवार राजकारणात तेजाने तळपत होते, मुख्यमंत्रीपदापासून केंद्राच्या राजकारणात आपला आब राखून होते. अनेक दिवस त्यांनी आपले बंधू अनंतराव यांचे चिरंजीव अजित पवार यांना राजकारणात प्रस्थापित केले पण इथेही काकांनी कधीतरी राजसंन्यास घ्यावा म्हणून पुतणे विरोधी पक्षात दाखल झाले. तिसरे उदाहरण आपण बीडचे घेऊया, बीडच्या मुंडे कुटुंबातील एकाच व्यक्तीचे दोन पुत्र होते पंडित काका आणि गोपीनाथराव अशी त्यांची नावे आहेत. मात्र गोपीनाथराव यांचे नेतृत्व राजकारणात चमकले. त्यांनी आपल्या कन्यांबरोबर आपल्या बंधूंचे माझे पंडित अण्णांचे चिरंजीव धनंजय यांना राजकारणात हवे ते दिले नाही म्हणून त्यांनीही काकांपासून फारकत घेतली. ही नवीन दोन-तीन उदाहरणे म्हणजे भांडणेच आहेत असे आपण समजले पाहिजे. अगदी कालपर्यंत ठाकरे कुटुंबात तरी काय झाले? या सर्व मंडळींनी एक दुसऱ्यांना शब्दांच्या किती गोळ्या मारलेल्या आहेत हे आम्ही सांगायची गरज नाही. अशा प्रकारची कितीतरी उदाहरणे पुराणात सापडतील, इतिहासात सापडतील, म्हणजेच अशा प्रकारचे कौरव-पांडवांचे युद्ध घराघरात सुरू असते. आताच्या काळात जी काही लढाई आहे ती सत्ता वर्चस्व आणि संपत्तीसाठी आहे असे आपण मानूया. आम्ही वर उल्लेख केलेले परवाचे भांडण नागपूर जवळील एका प्रस्थापित घराण्याचे आहे आपापसातील अशा प्रकारच्या लढायांमध्ये अनेक परिवार बर्बाद झालेले आहेत. न्यायालयाचे खटले लढणारे दोन्ही पक्ष लढता लढता कंगाल होतात हे आपण अनेकदा वाचले असेल किंवा बघितले असेल. मग या अशा संघर्षाला थांबवण्यासाठी कुठे काही करता येईल काय, याचा शोध घेतल्यावर नेमके काय दिसते. खरंतर तुम्ही आम्ही माणसेच आहोत पण हे सर्व पाहिल्यावर, माणुसकी माणुसकी काय असते. याचा विचार केल्यावर माणुसकी म्हणजे काय असते याचा बोधच होत नाही. त्यामुळेच माणसाची व्याख्या करताना माणूस हा क्षणाचा प्रेमळ प्राणी असून अनंत काळचा क्रूर श्वापद आहे असेच दिसते. काल घडलेल्या प्रकाराचे जे वर्णन वाचण्यात आले त्यावरून फक्त एका काहीतरी क्षुल्लक बाबीसाठी प्रहारावर किती प्रहार करणार याचे गणित कोणालाही सोडवता येत नाही. इतिहासातील पाने चाळली तर आम्ही वर दिलेल्या उदाहरणासारखी लाखो उदाहरणे सापडतील. वर्तमानात तर राजकारण करताना भावाविरुद्ध भाऊ, काका विरुद्ध काका, एवढेच कशाला बापाविरुद्ध पुत्र किंवा आजोबा विरुद्ध नातू, सासराविरुद्ध सून, आणि सुनेविरुद्ध सासू अशी अत्यंत अणकुचिदार नात्यातील भांडणे सापडतील. नंदुरबारच्या एका खासदाराला आणि महाराष्ट्राच्या एका मुख्यमंत्र्याला चक्क रक्ताच्या आणि सख्ख्या नातवानेच घरी बसवले, त्या गोष्टीलाही फार काळ गेलेला नाही. माणसा - माणसातील हा शूद्र व्यवहार क्षणोक्षणी दिसतो. म्हणूनच माणूस हा खराखुरा क्रूर प्राणी आहे असा आमचा सिद्धांत झाल्यासारखे वाटते. पिढ्या- पिढ्यांचे हे गाणे आधीही सुरू होते, आताही सुरू आहे आणि पुढेही सुरू राहील.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## राजुरा-आसीफाबाद मार्गावर भीषण अपघात

# पाच ठार, तीन गंभीर

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर / चंद्रपूर, दि. २५ :**
नागपूरहून राजुरा मार्गे कागजनगरकडे जात असताना सोंडो गावाजवळील वळण असलेल्या नाल्यावर कार पुलाच्या कठड्याला धडकून खाली कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतक हे कागजनगर येथील निजामुद्दीन कॉलनीतील रहिवासी असल्याची माहिती आहे.

कागजनगर येथील शेख कुटुंब नागपूर येथे रुग्णालयात उपचार घेत असलेल्या नातेवाईकाकडे गेले होते. त्यांना भेटून परतीच्या प्रवासात रात्री उशिरा सोंडो गावाजवळील वळण पुलावर कार अनियंत्रित झाली. ती पुलाच्या कठड्यांना धडक देत थेट नाल्यात कोसळली.



या दुर्घटनेत सायरा बेगम (४५), सलमा बेगम (४६), अफजल बेगम (५५) व अक्सा शबरीन (१३ ) यांचा जागीच मृत्यू झाला. उर्वरित तिघांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर चंद्रपूर येथे उपचार सुरू आहेत. उपचार सुरू असलेल्या पैकी एकाचा मृत्यू झाला. दरम्यान जखमी मध्ये नुसरत बेगम (४८), नजहात बेगम (५०), शहीन निशा (३७) आदींचा समावेश आहे.

अपघात रात्री उशिरा झाल्याने मदतकार्य उशिरा सुरू झाले. गाडीचे दरवाजे कापून मृतक व जखमींना बाहेर काढण्यात आले परिसरात अंधार असल्याने बचावकार्यात अडचणी आल्या.

दरम्यान, या मार्गावर महामार्गाचे काम सुरू असतानाही रस्ते सुरक्षेची पुरेशी व्यवस्था नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. संबंधित विभाग व ठेकेदारांच्या दुर्लक्षामुळेच अपघात झाल्याचा संताप व्यक्त होत आहे. अपघातातील कार (क्रमांक टी एस ०२ ई एन ५५४४) असून चालक सुखरूप असल्याची माहिती आहे. अधिक तपास सुरू आहे.

## स्लीपर बसला आग १२ जिवंत जळाले



■ **वृत्तसंस्था, चित्रदुर्ग, दि. २५ :**
कर्नाटकातील चित्रदुर्ग येथे बुधवारी रात्री उशिरा स्लीपर बसला धडक बसल्यानंतर आग लागली. या अपघातात बसमधील १२ हून अधिक लोक जिवंत जळाले. मात्र, काही मीडिया रिपोर्ट्समध्ये हा आकडा १७ सांगितला जात आहे. हा अपघात हिरियूर तालुक्यात झाला. बस बंगळूरुहून गोकर्णला जात होती. रिपोर्ट्सनुसार, बसमध्ये ३० हून अधिक प्रवासी होते.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, रात्री २.३० वाजता भरधाव वेगाने येणाऱ्या लॉरीने दुभाजक तोडून दुसऱ्या बाजूने जाणाऱ्या एका खाजगी कंपनीच्या सीबर्ड ट्रान्सपोर्टच्या बसला धडक दिली. बसला तात्काळ आग लागली. त्यावेळी प्रवासी झोपलेले होते. यामुळे त्यांना स्वतःला वाचवण्याची संधी मिळाली नाही.

बसने २ वाहनांना चिरडले

## ९ जणांचा मृत्यू, ४ जखमी

**चेन्नई :** तामिळनाडूच्या कडलोर जिल्ह्यात बुधवारी रात्री झालेल्या रस्ते अपघातात ९ लोकांचा मृत्यू झाला, तर ४ लोक गंभीर जखमी झाले. पोलिसांनी सांगितले की, तिरुचिरापल्लीहून चेन्नईकडे जाणाऱ्या रोडवेज बसचा राज्य महामार्गावर टायर फुटला होता.

बस अनियंत्रित होऊन दुभाजकावर चढून दुसऱ्या लेनमध्ये गेली आणि समोरून येणाऱ्या २ गाड्यांना चिरडले. दोन्ही गाड्या बसखाली अडकून पूर्णपणे चक्काचूर झाल्या. अपघाताची माहिती मिळताच तित्ताकुडी आणि रामनाथम पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि स्थानिक लोकांच्या मदतीने अडकलेल्या लोकांना बाहेर काढले. जखमींना तित्ताकुडी आणि पेरंबलूर येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## काँग्रेस मुंबईत सर्व २२७ जागा लढवणार

वंचित'सोबत चर्चा सुरू, पण 'मनसे'शी संवाद नाही : हर्षवर्धन सपकाळांनी स्पष्ट केली भूमिका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**
आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत काँग्रेसने आपली रणनीती स्पष्ट करण्यास सुरुवात केली आहे. वंचित बहुजन आघाडीसोबत आमची सकारात्मक चर्चा सुरू असून २८ स्थानिक पातळीवर दोन्ही संघटनांचे नेते संवाद साधत आहेत. मात्र, 'मनसे'सोबत चर्चा करण्याचा प्रश्नच येत नाही, अशा शब्दांत महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेसची भूमिका मांडली.



आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या राज्य निवड मंडळाच्या बैठक आज मुंबईत पार पडली. पहिल्या सत्रात विदभार्तील नागपूर, चंद्रपूर, अमरावती, अकोला महापालिकांचा आढावा घेण्यात आला. बैठकीनंतर हर्षवर्धन सपकाळ माध्यमांशी बोलत होते.

आम्ही मुंबईत पूर्ण २२७ जागा लढवू. ज्या जागा आम्हाला लढवायच्या आहेत, त्याच जागा शिवसेनेला लढवायच्या होत्या. त्यांच्या आणि आमच्यात संख्येचे गणित जुळत नव्हते, म्हणून मोकळीक करण्याच्या दृष्टीने वेगळे लढत आहोत, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणालेत.

प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीशी युती करण्याबाबत सपकाळ म्हणाले की, मुंबईत वंचित आणि काँग्रेसने एकत्र यावे, अशी अनेकांची इच्छा आहे. नगरपालिका निवडणुकीच्या वेळी आम्ही सर्व निर्णय जिल्हा स्तरावर सोपवले होते, त्याचप्रमाणे आताही २८ ठिकाणी स्थानिक पातळीवर दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये युतीबाबत चर्चा सुरू असल्याचे ते म्हणाले.

## बुलेट ट्रेनच्या कामाला 'ब्रेक'!


■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ :**
देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाला मुंबईत अडथळा निर्माण झाला आहे. वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) येथे सुरू असलेल्या बुलेट ट्रेन स्थानकाच्या बांधकामात वायू प्रदूषणाचे नियम पायदळी तुडवल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुंबई महानगरपालिकेने या प्रकल्पाचे काम तातडीने थांबवण्याची नोटीस बजावली आहे. या कारवाईमुळे बुलेट ट्रेनच्या कामाला तात्पुरता 'ब्रेक' लागला आहे.



बीकेसी परिसरात बुलेट ट्रेनच्या स्थानकाचे काम सुरू आहे. या बांधकामामुळे परिसरात धुळीचे लोट उसळत असून प्रदूषणात प्रचंड वाढ होत असल्याच्या तक्रारी पालिकेकडे प्राप्त झाल्या होत्या.

## १ कोटीचा बक्षीसी नक्षलवादी ठार

**जगदलपूर :** छत्तीसगडचे शेजारील राज्य ओडिशाच्या कंधमालमध्ये सुरक्षा दलांनी चकमकीत ६ नक्षलवाद्यांना ठार केले आहे. यामध्ये १ कोटींहून अधिक बक्षीस असलेला सेंट्रल कमिटी मेंबर गणेश उईके याचाही समावेश आहे. दोन महिला नक्षलवादीही मारल्या गेल्या आहेत. ठार झालेल्या नक्षलवाद्यांचे मृतदेह आणि शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.



सुरक्षा दलांना कंधमाल जिल्ह्यातील चाकापाड परिसरात नक्षलवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाली होती. याच माहितीच्या आधारे २३ पथकांना कारवाईसाठी पाठवण्यात आले होते. यामध्ये २० स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप, दोन सीआरपीएफ आणि एक बीएसएफ पथके समाविष्ट होती.

२५ डिसेंबर रोजी मोहिमेदरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी माओवादी आणि जवानांमध्ये अनेकदा गोळीबार झाला. चकमकीनंतर परिसरात शोधमोहीम राबवण्यात आली, ज्यात ५ नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळले. यामध्ये ३ पुरुष आणि २ महिला आहेत.

## बॉम्बस्फोटातील आरोपीची निर्दोष मुक्तता

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :**
दिल्ली स्थित एका न्यायालयाने दहशतवादी कृत्यांत कथित हात असणाऱ्या २ आरोपींची निर्दोष सुटका केली आहे. अब्दुल सुभान कुरेशी व अरीज खान अशी आरोपींची नावे आहेत. यापैकी अब्दुल सुभान कुरेशीला २००६ चा मुंबई रेल्वे बॉम्बस्फोट व गुजरात बॉम्बस्फोटप्रकरणी अटक करण्यात आली होती.

अब्दुल कुरेशीवर इंडियन मुजाहिदीन (आयएम) या अतिरेकी संघटनेशी संबंध असल्याचा आरोप आहे. कतर दुसरा आरोपी अरीज खान याच्यावर इंडियन मुजाहिदीन व सिमी या अतिरेकी संघटनांना पुनरुज्जीवित करण्याचा ठपका आहे. दोन्ही आरोपींवर यूएपीए कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. कुरेशीला पूर्व दिल्लीतील गाझीपूर येथून अटक करण्यात आली होती. तर अरीज आखान हा बाटला हाऊस एन्काऊंटर प्रकरणानंतर देशातून पळून गेला होता.

## महापौर पदासाठी नव्हे, मुंबईकरांसाठी लढाई : फडणवीस

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ :**
मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधूंच्या युतीनंतर राजकीय वातावरण तापले असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आक्रमक भूमिका घेत विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला आहे.



मुंबईत महापौर कोणाला करायचं, यासाठी आमची लढाई नाही, तर महायुतीची सत्ता आणून मुंबईकरांसाठी काम करणाऱ्यांना पुन्हा संधी द्यायची आहे, असा ठाम दावा करत फडणवीसांनी भावनिक राजकारणावरही निशाणा साधला. भ्रष्टाचार, विश्वासघात आणि स्वहिताच्या राजकारणाचा ट्रॅक रेकॉर्ड जनता विसरणार नाही, असा इशारा देत त्यांनी आगामी बीएमसी निवडणूक ही केवळ सत्तेची नव्हे, तर विचारांची लढाई असल्याचं स्पष्ट केलं आहे.

मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि तो आमचाच होणार, असा ठाम विश्वास व्यक्त केला होता. त्यानंतर फडणवीस यांनी आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे. मुंबईत कोणाला महापौर बनवायचं, यासाठी आमची लढाई नाही, तर मुंबई महापालिकेत महायुतीची सत्ता आणणं हेच आमचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी ठामपणे सांगितलं. मुंबई ही कोणाच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा विषय नसून, मुंबईकरांसाठी चाललेली लढाई असल्याचेही ते म्हणाले.

## शिंदे गटासाठी जागांची संख्या वाढवली, तरीही नाराजी

ठाकरे बंधू एकत्र येताच भाजपची रणनीती बदलली

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ :**
आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुधवारी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी युतीची औपचारिक घोषणा केल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे मुंबईतील मराठी मतदारांचा मोठा वर्ग एकवटण्याची शक्यता निर्माण झाली असून, ही युती भाजपसाठी मोठे आव्हान ठरू शकते, असा अंदाज राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केला जात आहे. हे लक्षात घेऊन भाजपने तातडीने आपली रणनीती बदलण्यास सुरुवात केल्याचे स्पष्ट झाले आहे.

ठाकरे बंधूंच्या युतीचा धोका ओळखत भाजपने आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसाठी मुंबई महापालिकेतील जागावाटपाबाबत लवचिक भूमिका घेतल्याची माहिती समोर आली आहे.

## प्रवेश सोहळ्यावरून भाजप नाशिकमध्ये वाद

देवयानी फरांदेंचा विरोध डावलून माजी आमदारासह ५ बड्या नेत्यांच्या हाती कमळ

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २५ :**
राज्यात आगामी महानगरपालिका निवडणुकीचे वारे वाहू लागताच राजकीय पक्षांतरांना वेग आला आहे. नाशिकमध्ये आज भाजपने 'इनकमिंग'चा धडाका लावत विरोधी पक्षांतील अनेक बड्या मोहऱ्यांना आपल्या गळाला लावले. मात्र, या पक्षप्रवेशावरून नाशिक भाजपमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आला आहे.



भाजपच्या नाशिक महापालिका निवडणूक प्रमुख आणि आमदार देवयानी फरांदे यांचा तीव्र विरोध डावलून हा सोहळा पार पडला. फरांदे यांनी या कार्यक्रमाला अनुपस्थित राहून आपली नाराजी उघडपणे व्यक्त केल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत आज नाशिकमधील अनेक दिग्गजांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यात प्रामुख्याने उबाठा शिवसेनेचे माजी महापौर विनायक पांडे, मनसेचे माजी महापौर आणि उबाठा नेते यतीन वाघ, काँग्रेस नेते शाहू खैरे, मनसेचे माजी आमदार नितिन भोसले आणि मनसेचे स्थानिक नेते दिनकर पाटील यांचा समावेश आहे.

या मोठ्या पक्षप्रवेशांमुळे भाजपची ताकद वाढणार असली, तरी स्थानिक पातळीवर मात्र अस्वस्थता आहे. विशेषतः माजी महापौर यतीन वाघ यांच्या प्रवेशाला आमदार देवयानी फरांदे यांचा कडाडून विरोध होता. देवयानी फरांदे या नाशिक महापालिका निवडणुकीच्या प्रमुख आहेत, तरीही त्यांच्या शब्दाला डावलून हे पक्षप्रवेश झाल्याने त्यांनी सोहळ्याला दांडी मारली. त्यांच्यासोबतच अनेक जुन्या कार्यकर्त्यांनीही या 'इनकमिंग'बद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

यतीन वाघ आणि दिनकर पाटील यांच्या पक्षप्रवेशापूर्वी नाशिक भाजप कार्यालयाबाहेर हाय वोलेटेज ड्रामा पहायला मिळाला. कोणत्याही परिस्थितीत हा पक्ष प्रवेश होऊ देणार नाही अशी भूमिका फरांदे यांनी घेतली होती.








। नागपूर । मुंबई । पालघर (ठाणे) । नाशिक । रायगड । अकोला । अमरावती । खामगांव
। यवतमाळ । वर्धा । गडचिरोली । वाशिम । भंडारा । गोंदिया । चंद्रपूर

दैनिक महासागरच्यावतिने प्रकाशित दिनदर्शिका २०१६ ही शनिवार दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी महासागरच्या अंकासोबत ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात येईल. ग्राहकांनी वितरकांकडे मागणी करावी.

# रोज नई सुबह है...

## सुप्रिया सुळेंचा स्पष्ट इशारा



**मुंबई :** पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाला धक्का देणाऱ्या प्रशांत जगताप यांच्या राजीनाम्यानंतर राजकीय वातावरण तापले असतानाच, खासदार सुप्रिया सुळे यांनी दिलेल्या एका वक्तव्याने चर्चेला वेग आला आहे. प्रशांत जगताप यांना शुभेच्छा देत रोज नई सुबह है; माझं पोट खूप मोठं आहे, असे म्हणत सुळेंनी केवळ प्रतिक्रिया दिली नाही, तर पक्षातील नाराजी, बंडखोरी आणि संभाव्य युतीवर अप्रत्यक्ष पण ठोस संदेश दिला आहे. राजीनाम्याच्या पार्श्वभूमीवर आलेलं हे विधान केवळ शब्दांचा खेळ नसून, आगामी महापालिका निवडणुकांआधी राष्ट्रवादीतील राजकीय समीकरणांची दिशा स्पष्ट करणारे मानले जात आहे. पुण्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवणारी घटना मंगळवारी घडली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आपल्या पदाचा तसेच पक्षाच्या प्राथमिक आणि क्रियाशील सदस्यत्वाचा राजीनामा दिला. पुणे महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी स्वतः हा निर्णय जाहीर केला. जवळपास 27 वर्षांची राजकीय-सामाजिक कारकीर्द असलेल्या जगताप यांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपल्या निर्णयामागील भूमिका मांडत, आजवर मिळालेल्या संधींसाठी पक्षनेतृत्वाचे आभार मानले. पद किंवा सत्तेसाठी नव्हे, तर पुरोगामी विचारांची चळवळ पुढे नेण्यासाठी आपण राजकारणात प्रवेश केला होता आणि हेच ध्येय पुढेही कायम राहील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रशांत जगताप म्हणाले की, 27 वर्षांपूर्वी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात पाऊल टाकताना कोणत्याही पदाची अपेक्षा नव्हती. समाजपरिवर्तनाच्या विचारांशी निष्ठा राखत मी काम करत राहिलो. आजही माझी वैचारिक भूमिका बदललेली नाही.

## मी खरा वाघ, ठाकरे बंधू केवळ कागदी

# रावसाहेब दानवे यांची टीका



**मुंबई :** भाजप नेते तथा माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी राज ठाकरे यांच्या टीकेला सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. मी ठाकरे बंधूंसारखा कागदी वाघ नाही. मी खरा वाघ आहे. मी डरकाळ्या मारत विधानसभा व लोकसभेत गेलो. आताच्या निवडणुकीनंतर ठाकरेंचे पक्ष अस्तित्वातही राहणार नाहीत, असे ते म्हणालेत. ठाकरे गट व मनसेची बुधवारी बहुप्रतिक्षित युती झाली. राज व उद्धव ठाकरे यांनी एका हॉटेलमध्ये या युतीची घोषणा केली. यावेळी पत्रकारांनी या युतीवर रावसाहेब दानवे यांनी केलेल्या टीकेविषयी प्रश्न केला होता. त्यावर राज ठाकरे यांनी उत्तरे देवाला दिली जातात, दानवांना नाही, असे म्हणत दानवेंना टोला हाणला होता. रावसाहेब दानवेंनी गुरुवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधताना राज यांच्या टीकेचा समाचार घेतला. यावेळी त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावरही टीका केली. रावसाहेब दानवे म्हणाले, ठाकरे बंधू एकत्र आले त्याचा आम्हाला आनंद आहे. आता दोघांनी पुढच्या काळात पुन्हा विभक्त होण्याची पाळी येऊ नये असे वाटू नये. 2019 व 2024 च्या निवडणुकीनंतर उद्धव ठाकरेंनी अनैसर्गिक युती केली. ते भाजपला सोडून काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेससोबत गेले. त्यांचे अडीच वर्षांचे सरकार या राज्यातील जनतेला आवडले नाही. त्यामुळे राज्यात सत्तांतर झाले. त्यांचा एकेक शिलेदार त्यांना सोडून गेला. एकीकडे त्यांच्या युतीची पत्रकार परिषद सुरू होती आणि दुसरीकडे त्यांचे कार्यकर्ते त्यांना सोडून जात होते. उद्धव ठाकरे यांनी या पत्रकार परिषदेत रावसाहेब दानवेंना आता भाजपत कुणीही विचारत नसल्याचीही टीका केली होती. यावर दानवे म्हणाले, भाजपने मला सभापती, आमदार, खासदार, दोनदा केंद्रात मंत्री व राज्यात पक्षाचा अध्यक्ष केले. मला पक्षात कुणी विचारत नसते तर असे केले असते का? माझा मुलगा तिसऱ्यांदा आमदार झाला. उद्धव ठाकरेंसारखा काळा बुरखा घालून, शेपटी खाली घालून मी विधान परिषदेत गेलो नाही.

# उद्धव ठाकरेंनी मराठी माणसांसाठी काय केले?

## सुषमा अंधारेंनी शिंदेंना घातली पोस्ट डिलीट न करण्याची गळ

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ :**



सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे बंधूंच्या युतीवर निशाणा साधला होता. या प्रकरणी त्यांनी उद्धव ठाकरे यांनी मुंबई व तेथील मराठी माणसांसाठी काय केले? असा खोचक सवाल उपस्थित केला होता. ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी या प्रकरणी शिंदेंच्या 2020 मधील एका ट्विटचा दाखला देत ठाकरेंनी मुंबईसाठी काय केले हे दाखवून दिले आहे. तसेच शिंदेंना ही पोस्ट डिलीट न करण्याची गळही घातली आहे.

उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांनी बुधवारी मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर युती करण्याची घोषणा केली आहे. यामुळे महायुतीचे मुंबईतील राजकीय समीकरण बिघडल्याचा दावा केला जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणी ठाकरे बंधूंवर निशाणा साधत त्यांनी मुंबई व तेथील मराठी माणसांसाठी काहीच केले नसल्याचा दावा केला होता. त्यांच्या या टीकेनंतर सुषमा अंधारे यांनी एकनाथ शिंदे यांची एक जुनी पोस्ट पोस्ट शेअर केली आहे.

उद्धव साहेबांनी मुंबई आणि मुंबईतल्या मराठी माणसासाठी काय केलं याचा लेखाजोखा तुम्ही स्वतः मांडत आहात. फक्त पोस्ट डिलीट करू नका तुम्हाला तुमचे गुरु आनंद दिघे यांची शपथ आहे, असे सुषमा अंधारे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यांची ही पोस्ट काही वेळातच सोशल मीडियावर व्हायरल झाली. सुषमा अंधारेंनी अन्य एका ट्विटद्वारे भाजपवरही निशाणा साधला. ठाकरेंनी युती केली म्हणजे सत्तेसाठी असं जर फडणवीसांच म्हणणं असेल तर मग अजित पवार अशोक चव्हाण आणि शिंदे सोबत असणारे तमाम भ्रष्टाचारी यांच्यासोबत भाजपने केलेली युती म्हणजे काय आध्यात्मिक समागम आहे का? असा सवाल त्यांनी यासंबंधी उपस्थित केला.

# एकाच कुटुंबातील ४ जणांचा संशयास्पद मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, नांदेड, दि. २५ :**

एकाच कुटुंबातील 4 सदस्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यात घडली आहे. या कुटुंबातील 2 मुलांनी रेल्वेसमोर उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. तर त्यांच्या आई-वडिलांचे मृतदेह घरातच झोपलेल्या स्थितीत आढळले. या घटनेमुळे पंचक्रोशीत खळबळ माजली असून, ही घटना आत्महत्या आहे की घातपात? याविषयी उलटसुलट चर्चा रंगली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, नांदेडच्या मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार गावात ही धक्कादायक घटना घडली आहे. बजरंग रमेश लखे (22), उमेश रमेश लखे (25) व रमेश होनाजी लखे (51) व राधाबाई रमेश लखे (44) अशी मृतांची नावे आहेत. बजरंग व उमेश हे सख्खे बंधू आहेत. रमेश व राधाबाई असे त्यांच्या आई-वडिलांची नावे आहेत. उमेश लखे हा मनसेचा मुदखेडचा माजी तालुका उपाध्यक्ष असल्याची माहिती आहे. तो सामाजिक कार्यात सक्रिय होता.

जवळा मुरार येथे रमेश लखे व राधाबाई लखे आपल्या कुटुंबासह राहत होते. त्यांना बजरंग व उमेश ही 2 मुले होती. हे एक सर्वसाधारण कुटुंब होते. अल्पभूधारक असूनही मोठ्या कष्टाने ते आपल्या संसाराचा गाडा ओढत होते. पण बजरंग व उमेश या दोघांनी आज गावाजवळून जाणाऱ्या रेल्वेखाली उडी घेऊन आपले आयुष्य संपवले. या घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी त्यांच्या घराकडे धाव घेतली असता त्यांचे आईवडीलही घरातील पलंगावर मृतावस्थेत आढळले. हे पाहून गावात एकच खळबळ माजली. गावकऱ्यांनी पोलिसांना त्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन घटनेचा तपास सुरू केला.

हे प्रकरण आत्महत्येचे आहे की, घातपाताचे? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण एकाच कुटुंबातील 4 जणांचा अशा प्रकारे मृत्यू झाल्यामुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिस निरीक्षक दत्तात्रय मंठाळे यांनी याविषयी बोलताना सांगितले की, आई-वडील घरात मृतावस्थेत आढळले असून, मुलांनी रेल्वेखाली आत्महत्या केली आहे. घटनेचा उलगडा करण्यासाठी न्यायवैद्यक पथकाला पाचारण करण्यात आले आहे. तपासानंतरच सत्य समोर येईल.

## उत्तर भारतीय बटोगे तो पिटोगेच्या बॅनरमुळे खळबळ

# मुंबईत राजकीय रणकंदन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**




राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे बिगुल वाजताच मुंबईतील राजकीय वातावरण तापू लागले आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत भाषिक अस्मितेचा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी येताना दिसत आहे. मराठी विरुद्ध उत्तर भारतीय असा संभाव्य संघर्ष उभा करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे संकेत काही दिवसांपासून मिळत होते. याच पार्श्वभूमीवर मुंबईतील काही भागांत उत्तर भारतीय बटोगे तो पिटोगे, अशा आशयाचे बॅनर झळकले आणि या पोस्टरमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. या बॅनरला उत्तर देत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांनी सोशल मीडियावर आक्रमक पोस्ट करत मराठी अस्मितेचा अपमान सहन केला जाणार नसल्याचा थेट इशारा दिला. या घटनेमुळे निवडणुकीआधीच मुंबईतील राजकारण तापले असून भाषिक ध्रुवीकरणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

संदीप देशपांडे यांनी या बॅनरवर प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले की, हा वाद मराठी विरुद्ध उत्तर भारतीय असा नसून, जाणीवपूर्वक राजकीय फायद्यासाठी तो निर्माण केला जात आहे. त्यांनी थेट भारतीय जनता पक्षावर आरोप करत म्हटले की, एआय जनरेटर वापरून तयार केलेल्या पोस्टरमागे भाजपचा हात आहे आणि उत्तर भारतीय मतदारांना आकर्षित करण्यासाठी मुद्दाम हा वाद पेटवला जात आहे. मराठी माणसाचा अपमान सहन केला जाणार नाही, हा संदेश देण्यासाठीच आपण सोशल मीडियावर पोस्ट केल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईकरांच्या भावना, भाषा आणि अस्मिता यांचा वापर फक्त मतांसाठी केला जात असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. मराठी माणूस कुणाच्या विरोधात नाही, पण त्याच्या स्वाभिमानावर आघात झाला तर उत्तर देणे अपरिहार्य ठरेल, असेही त्यांनी ठामपणे नमूद केले.

भाषिक मुद्द्यापुरतेच न थांबता संदीप देशपांडे यांनी सत्ताधाऱ्यांवर विकासाच्या मुद्द्यावरूनही जोरदार हल्ला चढवला. मुंबईकरांचा खरा हॅपिनेस इंडेक्स किती आहे, याचा विचार सत्ताधाऱ्यांनी करावा, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एकीकडे अटल सेतूसारख्या मोठ्या प्रकल्पांचे श्रेय घेतले जाते, मात्र दुसरीकडे मुंबईतील रस्ते खड्ड्यांनी भरलेले आहेत, याकडे त्यांनी लक्ष वेधले. रोजच्या जगण्यात सामान्य मुंबईकरांना कोणत्या सुविधा मिळतात, हा खरा विकासाचा निकष असल्याचे त्यांनी सांगितले. दोन-दोन हजार कोटींच्या घोटाळ्यांचे आरोप होत असताना सत्तेत असलेले पहारेकरी झोपेत होते का, असा उपरोधिक सवालही त्यांनी उपस्थित केला. गेली 25 वर्ष सत्ता उपभोगूनही मुंबईच्या मूलभूत समस्यांवर तोडगा न निघाल्याचा आरोप करत त्यांनी भाजपच्या कारभारावर टीका केली.

या साऱ्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांमध्ये संदीप देशपांडे यांनी भाजप नेते आशिष शेलार यांच्यावरही जोरदार टीका केली. शेलार यांना त्यांच्या पक्षात कोणी विचारत नसल्यामुळे ते रामदास आठवले यांच्याशी जवळीक वाढवत असल्याचा टोला त्यांनी लगावला. सत्तेत असलेले लोक जर गुंडांसारखे वागू लागले आणि भ्रष्टाचार करू लागले, तर त्यावर प्रश्न उपस्थित होणारच, असे म्हणत त्यांनी अनेक नेत्यांच्या नातेवाईकांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले.

# बाबुलनाथ मंदिराला महसूल विभागाकडून ३० वर्षांची लीज

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**

मुंबईतील श्रद्धास्थान असलेल्या श्री बाबुलनाथ मंदिरासाठी महसूल विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, श्री बाबुलनाथ मंदिर चॅरिटिजला नाममात्र एक रुपया दरात ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करून देण्यात आले आहे. या संदभार्तील शासन निर्णयाची प्रत यांनी बुधवारी सकाळी मंदिराच्या विश्वस्तांना सुपूर्द केली.

यावेळी महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री यांच्या सूचनेनुसार महसूल विभागाने हा निर्णय घेतला आहे. बाबुलनाथ मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, हा या निर्णयाचा प्रमुख उद्देश आहे.

हिवाळी अधिवेशनादरम्यान बाबुलनाथ मंदिरासाठी ३० वर्षांच्या लीजवर जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या जागेचा उपयोग दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक नागरी व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीच करण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या प्रस्तावासाठी आमदार व भाजप प्रदेश कोषाध्यक्ष यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. तसेच स्थानिक आमदार व मंत्री यांनीही या मागणीला शिफारस केली होती. अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार हा निर्णय प्रत्यक्षात आला आहे.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून कमर्शियल उड्डाणांची सुरुवात

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नवी मुंबई, दि. २५ :**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने 25 डिसेंबर 2025 रोजी पहिल्या कमर्शियल विमानाच्या आगमनासह आपल्या कामकाजाची सुरुवात केली. विमानतळावर विमानाचे आगमन होताच त्याला पारंपरिक वॉटर कॅनन(जल तोफेने) सलामी देण्यात आली. ही विमानसेवेतली जुनी परंपरा असून एनएमआयए वरील पहिल्या कमर्शियल लँडिंग आणि टेक-ऑफ चे प्रतीक आहे.

बंगळुरूहून आलेल्या इंडिगोच्या 6ए460 या पहिल्या विमानाचे सकाळी 8.00 वाजता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले आणि त्याचे पारंपरिक जल तोफेने स्वागत करण्यात आले. त्यानंतर विमानतळावरून पहिली इंडिगो फ्लाइट 6E882 हैदराबादसाठी सकाळी 08:40 वाजता रवाना झाली, ज्यामुळे एनएमआयएवरील पहिल्या लँडिंग आणि टेक-ऑफ चा टप्पा पूर्ण झाला.

एनएमआयएवर नियोजित प्रवासी विमानसेवेची सुरुवात ही भारताच्या नागरी विमानवाहतूक क्षेत्रासाठी एक महत्त्वाचा टप्पा असून मुंबई महानगर क्षेत्रासाठी (एमएमआर) हवाई प्रवासाची क्षमता वाढवणारी ठरणार आहे.

# उद्धव आणि राज ठाकरे यांना मोठा धक्का; अनेक नेते भाजपामध्ये सामील

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ :**



महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीपूर्वी, राज ठाकरे यांच्या मनसे आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना (यूबीटी) यांना गुरुवारी नाशिक जिल्ह्यात मोठा धक्का बसला. दोन्ही पक्षातील अनेक नेते भाजपामध्ये सामील झाले. यामध्ये मनसेचे माजी आमदार नितीन भोसले, शिवसेनेचे (यूबीटी) माजी महापौर विनायक पांडे, मनसेचे पहिले महापौर यतीन वाघ तसेच काँग्रेस नेते शाहू खैरे आणि संजय चव्हाण यांचा समावेश होता.

भाजपा मध्ये एक आश्चर्यकारक भर म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे)चे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, जे एक दिवसापूर्वीच राज ठाकरे यांच्या पक्ष आणि शिवसेना (यूबीटी) यांच्यातील युतीचा आनंद साजरा करत होते. ते त्यांच्या मुलासह आणि माजी नगरसेवक पत्नी लता पाटील यांच्यासह भाजप मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत पक्षात सामील झाले. महाजन म्हणाले की, लोक भाजपाच्या विचारसरणीवर विश्वास ठेवतात म्हणून ते सामील होत आहेत, जे १२२ सदस्यीय नाशिक महानगरपालिकेत १०० हून अधिक जागा जिंकेल. तरीही, बीजेपीच्या नाशिक सेंट्रलच्या आमदार देवयानी फरांदे यांनी विनायक पांडे, यतिन वाघ आणि शाहू खैर यांच्या पक्षात प्रवेश करण्याचा विरोध केला. त्यांच्या समर्थकांनी आणि पक्षाच्या इतर विश्वासू सदस्यांनी पक्षाच्या कार्यालयासमोर निदर्शन घेतले. फरांदे यांनी त्यांच्या फेसबुक पोस्टमध्ये म्हटले, "मी आज वॉर्ड नंबर १३ मध्ये या व्यक्तींच्या प्रवेशाचा स्पष्ट विरोध करते. मी त्या हिंदुत्व पक्ष कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक समर्थन करते जे प्रस्थापित व्यक्तींच्या विरोधात लढतात. निवडणूक प्रमुख असल्याने, या विषयावर मला विचारले गेले नाही. जय श्रीराम."

शिवसेना (यूबीटी) प्रमुख उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांनी बुधवारी औपचारिकपणे १५ जानेवारी रोजी होणाऱ्या बीएमसी निवडणुकीसाठी दोन्ही पक्षांमध्ये युतीची घोषणा केली, ज्यामुळे आठ महिन्यांपासून सुरू असलेल्या अटकळांना पूर्णविराम मिळाला. राज ठाकरेंसोबत संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, दोन्ही पक्ष एकत्र राहण्यासाठी एकत्र आले आहेत.

## आकाशात १५१५ ड्रोनचा भव्य शो आयोजित

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नवी मुंबई, दि. २५ :**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एनएमआयए) सुरू होण्याच्या पूर्वसंध्येला, विमानतळाच्या ऑपरेशनल लॉंचिंगच्या निमित्ताने 1515 ड्रोनचा भव्य आणि नेत्रदीपक ड्रोन शो आयोजित करण्यात आला. या शोमध्ये ड्रोननी उत्तम समन्वय साधत आकाशात आकर्षक आकृती साकारल्या. यामध्ये 3डी कमळ, लोटस डिझाइन इंटिरिअर्स, विमानतळाचा लोगो, ग्रीन एअरपोर्ट, मुंबईवरून उडणारे विमान, राइज ऑफ इंडिया विविध आकृती दाखवण्यात आल्या. या आकृतींमधून विमानतळाची संकल्पना आणि भव्यता दिसून आली. या कार्यक्रमात नवकल्पना आणि कलेचा सुंदर संगम पाहायला मिळाला. रात्रीचे आकाश जणू एक कॅनव्हास बनले आणि त्यावर अविस्मरणीय आणि लक्षवेधी आकर्षक दृश्ये साकारली गेली.

या कार्यक्रमाला विशेषतः दिव्यांग व्यक्ती, तरुण खेळाडू तसेच एनएमआयएचे कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी हा खास क्षण प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांसमोर अनुभवला.

# १ जानेवारीपासून बंद होणार भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २३ :**



देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या महाराष्ट्रातील पुण्यातील भीमाशंकर मंदिराबाबत मोठी बातमी समोर आली आहे. जर तुम्ही नवीन वर्षाची (२०२६) सुरुवात भगवान शंकराच्या दर्शनाने करण्याचा विचार करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. प्रशासनाने पुढील तीन महिने मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

भीमाशंकर मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय कोणत्याही धार्मिक कारणासाठी नाही तर विकास योजनांमुळे घेण्यात आला आहे. मंदिराच्या मुख्य 'सभा मंडपा'वर नूतनीकरणाचे काम सुरू आहे. बांधकाम मुख्य मंदिर संकुलात होणार असल्याने, मोठ्या गर्दीत कोणताही अनुचित प्रकार किंवा दुखापत टाळण्यासाठी प्रशासनाने भाविकांच्या प्रवेशावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील आठ दिवसांत अंतिम प्रशासकीय तपासणी केली जाईल, त्यानंतर बांधकाम कामाचा सविस्तर आराखडा तयार केला जाईल. मंदिर प्रशासनाच्या अधिकृत निवेदनानुसार, १ जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ पर्यंत भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर भाविकांसाठी पूर्णपणे बंद राहील. या काळात मंदिर संकुलात व्यापक विकास आणि नूतनीकरणाचे काम केले जाईल. मुख्य मंदिर आणि आजूबाजूच्या परिसराचे सुशोभीकरण केले जाईल. भाविकांसाठी रांगेची व्यवस्था आणि इतर पायाभूत सुविधा वाढवल्या जातील. सुरक्षा व्यवस्था आणखी कडक केली जाईल आणि मंदिराची पायाभूत सुविधा मजबूत केली जाईल.

भीमाशंकर मंदिरातील हे मोठे परिवर्तन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महाराष्ट्रातील सर्व ज्योतिर्लिंग मंदिरांना जगातील सर्वोत्तम धार्मिक स्थळांमध्ये विकसित करण्याच्या दृष्टिकोनाचा एक भाग आहे. या मंदिरांना भेट देणाऱ्या भाविकांसाठी केवळ जागतिक दर्जाच्या सुविधाच नव्हे तर अभेद्य सुरक्षा सुनिश्चित करण्याचे कडक निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

भाविकांच्या सोयीसाठी, मंदिर संकुलांना आता २८८.१७ कोटी रुपये खर्चून आलिशान प्रतीक्षालय, स्वच्छ पिण्याचे पाणी, सुधारित निवास व्यवस्था, पार्किंग आणि आधुनिक रेस्टॉरंट्स अशा सुविधांसह अधिक मजबूत केले जात आहे. मुख्यमंत्र्यांचा असा विश्वास आहे की या विकासामुळे केवळ पर्यटन वाढेल आणि पर्यावरणाचे रक्षण होईलच, शिवाय स्थानिक लोकांसाठी रोजगाराच्या नवीन संधीही उपलब्ध होतील.

# महानगरपालिकांत वंचितसोबत आघाडीचे संकेत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**



राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीबरोबर आघाडी करण्याचे संकेत स्पष्टपणे दिले आहेत. महानगरपालिकांमध्ये वंचितसोबत आघाडी व्हावी, यासाठी दोन्ही बाजूंनी प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. संवाद सकारात्मक असून अनेकांची अशी इच्छा आहे की ही आघाडी प्रत्यक्षात यावी, असे प्रतिपादन यांनी केले.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस पक्षाच्या राज्य निवडमंडळाची बैठक आज मुंबईतील टिळक भवन, दादर येथे पार पडली. या बैठकीत २८ महानगरपालिकांमधील निवडणूक तयारीचा सखोल आढावा घेत उमेदवारांच्या नावांवर, सामाजिक संतुलन (सोशल इंजिनिअरिंग) आणि स्थानिक परिस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची मोठी उपस्थिती होती. यात विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते, विधानपरिषद गटनेते, माजी मुख्यमंत्री, माजी मंत्री , गोव्याचे प्रभारी, एआयसीसी सचिव, बी.एम. संदीप, माजी मंत्री, प्रफुल्ल गुडधे पाटील, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे उपनेते, माजी मंत्री, महिला काँग्रेस अध्यक्षा, युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष, सेवादल प्रदेशाध्यक्ष , एनएसयूआय अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष (संघटन व प्रशासन), मोहन जोशी आणि वरिष्ठ प्रवक्ते यांचा समावेश होता. महानगरपालिकांच्या निवडणुका १५ तारखेला जाहीर झाल्यानंतर लगेचच नियोजनाला सुरुवात करण्यात आली होती. निवडणूक व्यवस्थापन, उमेदवार निश्चिती आणि रणनीती ठरवण्याच्या दृष्टीने आजचा टप्पा महत्त्वाचा आहे.

# भरधाव वाहनाची ऊसतोड कामगारांच्या बैलगाड्यांना धडक

■ **महासागर प्रतिनिधी, बीड, दि. २५ :**



एका भरधाव वाहनाने ऊसतोड कामगारांच्या बैलगाड्यांना धडक दिल्याची भयंकर घटना बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात घडली आहे. या घटनेत 14 ऊसतोड कामगार जखमी झाले असून, एका बैलाचाही मृत्यू झाला आहे. ही धडक एवढी भीषण होती की, बैलगाड्या तब्बल 200 फुटांपर्यंत फरफटत गेल्या.

यासंबंधीच्या माहितीनुसार, आष्टी तालुक्यातील काही ऊसतोड कामगार गुरुवारी पहाटे आपल्या बैलगाड्यांसह वृद्धेश्वर साखर कारखाना (पिंपळगाव कासार) येथे ऊसतोडणीसाठी जात होते. त्यांच्या बैलगाड्यांना पहाटे 6 च्या सुमारास तिसगाव - शेवगाव रस्त्यावर समोरून येणाऱ्या एका भरधाव वेगातील वाहनाने जोरदार धडक दिली. ही धडक एवढी भीषण होती की, बैलगाड्या तब्बल 200 फूट लांब वाहनासोबत फरफटत गेल्या. या घटनेत 14 कामगार जखमी झाले. तर एका बैलाचा जागीच मृत्यू झाला. इतर 5 बैल गंभीर जखमी झालेत. जखमी कामगारांपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना तिसगाव येथील श्री हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी हलवले. तर नाना शेंडगे व शरद शेंडगे या गंभीर जखमींना अहिल्यानगर येतील इम्पल्स रुग्णालयात हलवण्यात आले. सध्या तिसगाव येथे अभिषेक मरगळ, विशाल मरगळ, कोमल ठेंगल, राणी ठेंगल, अशोक ठेंगल, सीमा शेंडगे, संगीता शेंडगे, बबन शेंडगे, लिलाबाई शेंडगे, आदित्य शेंडगे, तुळजाई शेंडगे व राणी गोल्हार यांच्यावर उपचार सुरू आहेत. बहुतांश जखमींना गंभीर स्वरूपाचे फ्रॅक्चर व अंतर्गत जखमा झाल्या आहेत.

भाजप आमदार सुरेश धस यांनीही या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तातडीने पोलिस प्रशासनाशी संपर्क साधून रुग्णवाहिका व मदतीची व्यवस्था केली. त्यांनी रुग्णालयात जाऊन तेथील डॉक्टरांशी चर्चा केली. तसेच जखमींच्या कुटुंबीयांना धीर दिला. या अपघातानंतर स्थानिकांत कमालीचा रोष उसळला आहे. त्यांनी दोषी वाहनचालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या घटनेमुळे ऊसतोडणी कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

महासागर अमरावती

शुक्रवार, दि. 26 डिसेंबर 2025



# अकरा गोवंशसह बोलेरो पिकअप जप्त

## शिरखेड हद्दीतील घटना



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 25)** – मोर्शीहून अमरावतीकडे येत असलेल्या 11 गोवंशांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सुटका केली. या कारवाईत गोवंश व वाहनासह एकूण 11 लाख 21 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई 25 डिसेंबर रोजी शिरखेड ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली.

पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली गोवंशीय जनावरांची अवैध वाहतुक आणि कत्तल रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली होती. शिरखेड परिसरात गस्त घालत असताना पोलीस उपनिरीक्षक विशाल रोकडे यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की मोर्शीहून बोलेरो पिकअपमध्ये गोवंशीय जनावरांची क्रूरतेने वाहतुक सुरु आहे. या माहितीवरून पोलिसांनी वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वाहन एका झाडाला धडक दिली आणि आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलीसांनी पाठलाग करून एक आरोपी शोएब अख्तर अब्दुल सलीम (वय 30, जमील कॉलनी, अमरावती) याला पकडले, तर दोन आरोपी सुफीयान कुरेशी वाजिद कुरेशी (28) आणि शेख मझहर शेख हबीब (30, दोघेही जमील कॉलनी, अमरावती) फरार झाले. तपासादरम्यान जप्त केलेल्या गोवंशीय पशूंची किंमत 1 लाख 21 हजार रुपये, तर बोलेरो पिकअप वाहनाची किंमत 10 लाख रुपये असून एकूण 11 लाख 21 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त झाला. जप्त केलेला माल आणि आरोपी शिरखेड पोलीस ठाण्याला हस्तांतरित करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी मोर्शी संतोष खांडेकर व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरखेड पोलीस ठाण्याचे प्रभारी ईश्वर वर्गे, विशाल रोकडे, संतोष तेलंग, दीपक पाल, मनोज कळसकर, राजेश कासोटे, दीपक पाटील, मारोती वैद्य, अरुण श्रीनाथ आणि चालक कुणाल भुयार यांनी केले.

# महापालिका निवडणूक

# अखेर भाजप शिवसेना युती

### जागा वाटपही निश्चित





महासागर | प्रतिनिधी

**अमरावती (दि.25)**– अमरावती महापालिका निवडणुकीत अखेर भाजप व शिवसेना (शिंदे गट) युतीवर शिक्कामोर्तब झाले. गुरुवारी (दि. 25) नागपूर येथे झालेल्या महत्वपूर्ण बैठकीत जागावाटपावरही दोन्ही पक्षांमध्ये तडजोडीने सहमती झाली; मात्र कोणत्या प्रभागात कोणत्या पक्षाला किती जागा राखीव राहतील, याचा अधिकृत खुलासा अद्याप करण्यात आलेला नाही. त्यामुळे शहरातील राजकीय वातावरणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

नागपूर येथे वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीस भाजपचे आमदार संजय कुटे, निवडणूक प्रमूख जयंत डेहनकर, शिवसेनेचे माजी खासदार आनंदराव अडसूळ, उपनेत्या प्रिती बंड, शाम देशमुख, संतोष बद्रे आणि दोन्ही पक्षांचे महत्त्वाचे पदाधिकारी सहभागी झाले होते. सुमारे तीन तास चाललेल्या चर्चेनंतर अखेर युतीची अधिकृत घोषणा करण्यात आली.पक्षीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सत्तास्थापन आणि निवडणूक रणनितीसंदर्भात मूलभूत आराखडा तयार झाला आहे. शहरातील काही प्रभागांमध्ये वाढत्या स्पर्धेमुळे जागावाटप गुंतागुंतीचे ठरण्याची शक्यता असल्याचेही बोलले जात आहे.

### कार्यकर्त्यांचे गणित बिघडणार?

या युतीमुळे दोन्ही पक्षांतील इच्छुकांच्या गणितात मात्र मोठे बदल झाले आहेत. अनेक कार्यकर्त्यांनी गेल्या काही महिन्यांपासून केलेली तयारी, प्रचाराची चाचपणी, प्रभागनिहाय संपर्क यात गुंतवणूक केली असतानाच अचानक युती जाहीर झाल्याने अनेकांच्या 'तिकीटाचे भवितव्य' धोक्यात आल्याची भावना व्यक्त केली जात आहे. शहरातील दोन्ही पक्षांच्या काही इच्छुकांमध्ये तणाव व संभ्रमाची स्थिती असून, 'आपल्याला तिकीट मिळेल की नाही?' याची चिंता कार्यकर्त्यांना सतावत आहे. युती झाल्यामुळे महापालिका निवडणुकीत आता लढत रंगणार असून , विरोधी पक्षांसाठी हे आव्हान ठरणार की, नवी संधी तयार होणार? याकडे अमरावतीच्या राजकीय वर्तुळासह सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

# महादेवनगरात मसन्याउदचा थरार; नागरिकांची रात्रभर गस्त

### भीतीचे वातावरण, सर्पमित्रांच्या साहाय्याने पकडला

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 25)** – शहरातील बिबट्याची दहशत अद्याप थांबली नसतानाच महादेवनगर परिसरात गेल्या तीन दिवसांपासून मसन्याउद नागरिकांची झोप उडवित आहे. मोठ्या झाडांनी व्यापलेल्या अंबा कॉलनी, अंबा विहार व महालक्ष्मीनगर भागांत आढळलेला हा प्राणी नागरिकांसाठी धोकादायक ठरला होता. या मसन्याउदला सर्पमित्रांनी मंगळवारी रेस्क्यू करून सुरक्षीतरित्या जंगलाच्या सानिध्यात सोडले. स्थानिक रहिवाशांनी रात्रभर परिसरावर लक्ष ठेवून पहारा दिला. दरम्यान, मंगळवारी रात्री हा मसन्याउद पाठक यांच्या किराणा दुकानात दिसून आला. भितीने नागरिकांनी दुकानदारांकडे धाव घेतली आणि तातडीने वनविभागाला सूचना केली. सुमारे 30 फूट उंच झाडावर बसलेला प्राणी खाली उतरविणे अत्यंत कठीण झाले. सर्पमित्रांची मदत घेण्यात आली. अक्षीद सावला, केशव देशमुख, साहिल खांडखुरे व सौरभ बागडे यांनी संयमित पद्धतीने मसन्याउद पकडला आणि एका पोत्यात ठेवून सुरक्षितपणे जंगलात सोडले. यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास घेतला. मसन्याउद शहरात अचानक दिसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. किराणा व्यवसायिक अंकुश पाठक यांनी सांगितले, माझ्या



दुकानात मसन्याउद शिरल्याने मोठी दहशत निर्माण झाली होती. सर्पमित्रांच्या साहाय्याने तो बाहेर काढला गेला, नाहीतर परिस्थिती अधिक धोकादायक होऊ शकली असती. वनविभागाने नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचा इशारा दिला असून, उद्याने व झाडांवर असणाऱ्या प्राण्यांबाबत लक्ष ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# माजी उपनगराध्यक्षांचा भाजप प्रवेश ठरला निर्णायक

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, (दि.25)** – अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणूक तब्बल नऊ वर्षांनंतर पार पडली असून, या काळात राजकीय गणितात मोठे बदल पाहायला मिळाले. निवडणुकीपूर्वी सत्ताधारी भाजपमध्ये सुरू असलेल्या घडामोडीत महत्त्वाचा टप्पा म्हणजे माजी उपनगराध्यक्ष देविदास नेमाडे यांचा पक्षप्रवेश ठरला. आमदार प्रकाश भारसकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, मुंबईतील कार्यक्रमात मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत नेमाडे यांनी भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केला. यावेळी त्यांचे सुपुत्र, युवा उद्योजक प्रविण नेमाडे यांनी देखील भाजपचा झेंडा हाती घेतला.



युवा उद्योजक प्रविण नेमाडे यांनी प्रभाग क्रमांक 3 मधून भाजप तर्फे उमेदवारी दाखल केली होती. या प्रभागातून त्यांनी तब्बल 1,128 मते मिळवत सर्वाधिक मतांनी विजय संपादन केला. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली प्रभागातील सदस्य पदाचे उमेदवार आणि नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला मिळून 1,061 मतांची आघाडी मिळाली. दरम्यान, शिवसेना (शिंदे गट) च्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला फक्त 787 मते मिळाल्याने भाजपने स्पष्ट आघाडी घेतल्याचे चित्र स्पष्ट झाले.

नेमाडे यांनी नातेसंबंध, वैयक्तिक समीकरण बाजूला ठेवत पक्षनिष्ठेला प्राधान्य दिले. परिणामी संपूर्ण प्रभागात भाजपच्या उमेदवारांना निर्णायक विजय मिळवून देण्यात त्यांचा वाटा ठळकपणे जाणवला आहे. नगराध्यक्ष पदाच्या अटीतटीच्या लढतीतही नेमाडे यांच्या हालचालींची सतत चर्चा रंगली. पक्षाला दिलेला शब्द पाळत त्यांनी भाजपला नगराध्यक्ष पद मिळवून दिल्याने, नेमाडे परिवाराची पक्षातली पकड अधिक मजबूत झाली असून शहरात त्यांच्या भूमिकेची चर्चा चव्हाट्यावर आहे.

# चिचफैल येथील घरातून प्रतिबंधित नायलॉन मांजा जप्त

**अमरावती** – शासनाने बंदी घातलेल्या प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या विक्रीविरोधात राजापेठ पोलिसांनी 25 डिसेंबर रोजी धडक कारवाई केली. पोलिसांनी चिचफैल येथील घरातून नायलॉन मांजा जप्त केला आहे. या प्रकरणी एका इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 23 डिसेंबर 2025 रोजी राजापेठ पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, चिचफैल परिसरात राहणारा शशीकांत सुभाषराव काटे (वय 52, रा. चिचफैल, अमरावती) हा त्याच्या राहत्या घरी शासनाने बंदी घातलेला नायलॉन मांजा विक्रीसाठी साठवून ठेवत आहे. मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार राजापेठ पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीच्या राहत्या घरावर छापा टाकला. या छाप्यात आरोपीकडून मोनो काईट कंपनीचे 17 नग नायलॉन मांजाचे चक्री (अंदाजे किंमत 12 हजार रुपये) तसेच गोल्ड कंपनीचे 08 नग नायलॉन मांजाचे चक्री (अंदाजे किंमत 8 हजार रुपये) असा एकूण 20 हजार रुपयांचा प्रतिबंधित नायलॉन मांजा जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपी शशीकांत सुभाषराव काटे याच्याविरुद्ध राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भीषण अपघातात राहू येथील वनरक्षकाचा मृत्यू

### पाटाखेडा-देडपाणी मार्गावर समोरासमोर भिडल्या मोटरसायकली





महासागर | प्रतिनिधी

**चुरणी, (दि.25)** – मध्यप्रदेशातील पाटाखेडा-देडपाणी गावाजवळ बुधवारी दुपारी सुमारे 4 वाजताच्या सुमारास दोन मोटरसायकलींमध्ये समोरासमोर झालेल्या जोरदार धडकेत एकाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात महाराष्ट्रातील माडिझडप येथील रहिवासी व राहु येथे वनरक्षक म्हणून कार्यरत असलेले शिवा बेठेकर (वय 30) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. धडकेत सहभागी असलेल्या मोटरसायकलींचे क्रमांक एमपी 48/ झेडडी 104 व एमएच 47/ एएफ 0847 असे आहेत.



देडपाणी परिसरातील हा मार्ग अपघातप्रवण असून यापूर्वीही अनेक दुर्घटना घडल्या आहेत. त्यामुळे वाहतूक सुरक्षेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून जोर धरत आहे.अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळाकडे धाव घेत बचावकार्य सुरू केले. माहिती मिळताच भैसदेही पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र अपघात कोणत्या परिस्थितीत घडला याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. भैसदेही पोलीस स्टेशनच्या वतीने अपघाताची नोंद घेऊन पुढील तपास सुरू आहे. शिवा बेठेकर यांच्या अकाली निधनामुळे राहु व माडिझडप परिसरात शोककळा पसरली आहे. गुरुवारी भैसदेही येथे शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

# फिनीश लाईनचा वेध घेत धावले 2 हजार 164 धावपटू

### अटल दौड राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन | राज तिवारी व साक्षी जडयाल ठरले विजेते











महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,(दि.25)** – माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त गुरुकुल बहुद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा ॲथलेटिक्स संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अटल दौड राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन' स्पर्धेत राज्यभरातील 2,164 धावपटूंनी फिनीश लाईनचा वेध घेत उत्साहात सहभाग नोंदविला. दसरा मैदानावर गुरुवारी सकाळी सहा वाजता धावपटूंनी जल्लोषात सुरुवात केली.

पुरुष 21 कि.मी. गटात मुंबईच्या राज तिवारीने अव्वल क्रमांक पटकावून टीव्हीएस स्पोर्ट दुचाकी जिंकली, तर महिला गटात चिपळूणच्या साक्षी जडयाल हिने प्रथम क्रमांक पटकावून टीव्हीएस ज्युपिटर असा बहुमान मिळविला. स्पर्धेत 21, 10, 8, 5 व 3 किलोमीटर अंतरांच्या शर्यती तसेच रन फॉर अमरावती खुला गट अशा विविध विभागांमध्ये धावपटूंनी आपले कौशल्य सादर केले. स्पर्धेला खासदार डॉ. अनिल बोंडे, तुषार भारतीय, निवेदिता चौधरी, माजी महापौर चेतन गावंडे, ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव प्रा. अतुल पाटील आदी मान्यवरांनी झेंडा दाखवून सुरुवात केली. शहरातील प्रमुख मार्गांवरून शर्यत पार पडत असताना प्रत्येक चौकात धावपटूंचे फुलांनी स्वागत, पाणी, औषधे, वेदनाशामक स्प्रे यांसह आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध होत्या. वाहतूक पोलीस, 500 पेक्षा अधिक स्वयंसेवक व शिक्षकांसह मोठा बंदोबस्त तैनात होता. राजापेठ, दस्तूरनगर, काँग्रेसनगर, शेगाव रोड, जयस्तंभ चौक, सातूर्णा, नवाठे चौक आदी मार्गाने परत दसरा मैदानावर स्पर्धेची सांगता झाली. विजेत्यांना रोख पारितोषिक, पदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

### बाहेरगावाहून आलेल्यांसाठी विशेष व्यवस्था

बाहेरगावाहून आलेल्या धावपटूंसाठी निवास व भोजनाची व्यवस्था लोहाना महाजन वाडीत करण्यात आली होती. ही मॅरेथॉन दरवर्षी घेण्यात येत असून यंदा उत्तम नियोजन, सुरळीत व्यवस्था व उत्स्फूर्त प्रतिसादामुळे स्पर्धा यशस्वी पार पडल्याची माहिती आयोजकांनी दिली. आयोजनासाठी सचिन मोहोळ, तुषार चौधरी, निरंजन दुबे, राम शेगोकर आदींसह अनेक सदस्यांनी परिश्रम घेतले.

# एनडीपीएस व डॉग स्क्वॉडसह रात्रीच्या सरप्राईज धाडी

- शहर पोलिसांकडून 37 कारखान्यांची झडती
- बंद व सुरू कारखान्यांची कसून तपासणी



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 25)** – शहरात अवैधरित्या अंमली पदार्थ निर्मिती, बनावट दारू व गुटखा तयार करण्याच्या कारवायांना आळा घालण्यासाठी अमरावती शहर पोलिसांनी व्यापक शोधमोहीम सुरू केली आहे. या मोहिमेच्या पहिल्याच दिवशी चार पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील बंद तसेच सुरू असलेल्या एकूण 37 कारखान्यांची झडती घेण्यात आली. मात्र, या तपासणीत कोणतीही संशयास्पद अथवा बेकायदेशीर बाब आढळून आली नसल्याची माहिती पोलीस उपायुक्त गणेश शिंदे व श्याम घुगे यांनी गुरुवारी दिली.

ही मोहीम पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून, यावेळी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनित कुलट यांची उपस्थिती होती. पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी सांगितले की, गुरुवारी नांदगावपेठ, राजापेठ, बडनेरा व वलगाव पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील कारखान्यांची तपासणी करण्यात आली. या ठिकाणी अंमली पदार्थ, अवैध गुटखा, बनावट दारू किंवा तत्सम बेकायदेशीर उद्योग सुरू आहेत काय, याची सखोल चौकशी करण्यात आली. ही मोहीम सातत्याने सुरू राहणार असून, आगामी काळात एनडीपीएस पथक व डॉग स्क्वॉडच्या मदतीने विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. तसेच रात्रीच्या वेळी अचानक सरप्राईज व्हिजिट देऊन झडती घेतली जाणार आहे. या कारवाईसाठी गुन्हे शाखेची चार स्वतंत्र पथके तयार करण्यात आली आहेत.

### संशयास्पद आढळल्यास कठोर कारवाई

शोध मोहिमेदरम्यान कोणत्याही कंपनीत संशयास्पद अथवा अवैध कारवाया आढळून आल्यास संबंधित कंपनीविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. सुमारे वर्षभरापूर्वी बडनेरा मार्गावरील एमआयडीसी परिसरात बनावट दारू निर्मितीचा पर्दाफाश करत पोलिसांनी छापा टाकून तीन आरोपींना अटक केली होती, याची आठवणही यावेळी करून देण्यात आली.

### बंद कारखान्यांतच बेकायदेशीर उद्योग

पोलीस तपासात असे निदर्शनास आले आहे की, अनेकदा बंद पडलेल्या कारखान्यांचा वापर करून बनावट दारू, अवैध गुटखा व अंमली पदार्थ तयार केले जातात. विशेष म्हणजे, ज्या शहरात माल तयार होतो, त्या शहरात त्याची विक्री न करता इतर शहरांमध्ये अथवा राज्यांमध्ये त्याची तस्करी केली जाते. याच पार्श्वभूमीवर अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ही व्यापक शोधमोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत बंद कारखान्यांवरील चौकीदारांची कसून चौकशी करण्यात येत असून, दिवसा किंवा रात्री कोणतीही बेकायदेशीर हालचाल सुरू असते का, याची माहिती घेतली जात आहे. आगामी दिवसांत ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिस विभागाने स्पष्ट केले आहे.

# मुंबईचे लचके नि मराठी माणूस, पुन्हा ऐरणीवर..

: विश्लेषण :
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

उबाठा सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मुंबईत एका संयुक्त पत्रकार परिषदेत उबाठा सेना व महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची युती झाल्याचे जाहीर केले.

ठाकरे बंधू एकत्र येणार याचा मिडियातून मोठा गवगवा झाला होता. वीस वर्षापूर्वी राज ठाकरे हे अविभाजित शिवसेनेतून बाहेर पडले आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची त्यांनी स्थापना केली. शिवसेना व मनसे या दोन्ही पक्षांचा आधार मराठी माणूस व मराठी अस्मिता आहे.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर ठाकरेंच्या शिवसेनेला भगदाड पडले, शिवसेना पक्ष, निवडणूक चिन्ह शिंदे घेऊन गेले. आज शिंदे यांच्या शिवसेनेचे साठ आमदार विधासभेत आहे. उध्दव ठाकरेंच्या पक्षाचे केवळ वीस आमदार निवडून आलेत. राज यांच्या पक्षाकडे आज एकही आमदार नाही आणि एकही नगरसेवक नाही.

ठाकरे बंधूंना प्रसिध्दी भरपूर मिळत असते पण अपेक्षित मतदान होत नाही. दिल्लीतील भाजपाचे हायकमांड मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करणार अशी भिती दाखवून आणि मराठी जनतेला आता चुकाल तर संपाल असे भावनिक आवाहन करून ठाकरे बंधू मुंबई- ठाणे - नाशिक महापालिकांवर सत्ता काबीज करू शकतील का ? बलाढ्य भाजपाला आव्हान देण्याइतपत ठाकरे बंधुंकडे आज मनी पॉवर व मसल पॉवर आहे का ?

मराठीच्या मुद्यावर जुलै २०२५ मधे ठाकरे बंधू प्रथम एकाच मंचावर आले, त्यानंतर गेल्या सहा महिन्यात ते एक डझनवेळा तरी एकमेकांना भेटले. आम्ही एकत्र आलोत ते एकत्र राहण्यासाठी याचा पुनरूच्चार उद्धव ठाकरेंनी संयुक्त पत्रकार परिषदेत केला.

मुंबईला कोणी तोडण्यासाठी आले तर त्याचा खात्मा करू असा इशाराही दिला. राज ठाकरे यांनीही कोणत्याही वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे, याचा पुनरूच्चार केला. ठाकरे बंधूंनी निवडणुकीसाठी युती झाल्याचे जाहीर केल्यानंतर दोन्ही पक्षातील सैनिकांमधे आनंदाची लाट उसळली. गुलाल उधळला गेला, फटाक्यांची आतषबाजी झाली, एकमेकांना पेढे भरवले गेले, ढोल ताशेंच्या गजरात जल्लोष झाला.

उध्दव ठाकरे यांची पत्नी रश्मी, पुत्र आदित्य तसेच राज यांची पत्नी शर्मिला, पुत्र अमित असा सर्व ठाकरे परिवार एकाच मंचावर आला तेव्हा दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते सुखावले. ठाकरे बंधू एकत्र आले, आमचे स्वप्न पूर्ण झाले अशी भावना दिसून आली. युतीची घोषणा झाली तरी ठाकरे बंधूंनी आपले सर्व पत्ते उघड केलेले नाहीत.

आमची युती झाली, एवढीच घोषणा संयुक्त पत्रकार परिषदेत झाली. कोणत्या महापालिकेत कोणता पक्ष किती जागा लढवणार हे कोणी सांगितले नाही. राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुका आहेत. पैकी कोणत्या महापालिकेत युती लढणार हेही स्पष्ट केले नाही. महाआघाडीचे भविष्य काय? काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (तुतारी) व वंचित यांना बरोबर घेणार का? याचे उत्तर मिळाले नाही.

युती कोणत्या मुद्द्यावर झाली, अजेंडा काय याचाचा उलगडा झाला नाही. ठाकरे बंधुंची पत्रकार परिषद झाल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजपाचे निवडणूक प्रमुख व कॅबिनेटमंत्री आशिष शेलार हे ठाकरें बंधुंवर अक्षरशः तुटून पडले. उद्धव व राज हे दोघे भाऊ एकत्र आले म्हणून आनंद व्यक्त करीत भाजपाच्या या तिनही दिग्गजांनी ठाकरे बंधूंवर हल्ला चढवला.

ठाकरे बंधू एकत्र आल्याने महायुतीवर काहीही परिणाम होणार नाही हे भाजपाने बजावले आहे. मुंबईचा महापौर हा मराठीच होईल व ठाकरे बंधुंचा असेल असे राज ठाकरे व संजय राऊत यांनी निक्षून सांगितले पण भाजपाने मात्र मुंबईचा महापौर मराठीच होईल व महायुतीचा होईल असा पलटवार केला आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनीही पक्षाचा विस्तार करताना मुंबईचे केंद्राकडून लचके तोडले जातील अशी अनेकदा भिती घातली होती. मराठी माणूस व मराठी अस्मिता हा शिवसेनाचा तर आधार आहे. आता तेच तेच मुद्दे ठाकरे बंधूंना किती लाभदायक ठरतील? बावनकुळे यांनी तर घिसीपीटी कॅसेट म्हणून ठाकरे बंधूंची खिल्ली उडवली आहे.

निवडणूक प्रचारात भाजपा नेत्यांना उघडे पाडण्यासाठी आपल्याकडे अनेक व्हिडिओ आहेत असे सांगून राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा लाव रे तो व्हिडिओ चे संकेत दिले. पण राज यांनी वेळोवेळी बदलेल्या भूमिकेचे अनेक व्हिडिओ आमच्याकडेही आहेत, असा इशारा आशिष शेलार यांनी दिला आहे.

ठाकरे बंधू यांनी वीस वर्षांनी आपण युती केल्याचे जाहीर केले, पण ते दोघे वेगळे का झाले होते? मातोश्रीवरील विठ्ठलाला बडव्यांनी घेरले आहे, असे आरोप करून राज यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला होता. चार कारकुनांनी पक्षाचा ताबा घेतला आहे असे राज ठाकरे यांनी तेव्हा म्हटले होते. मनसे हा संपलेला पक्ष आहे मी त्याविषयी बोलणार नाही, असे वक्तव्य आदित्य ठाकरे यांनी केले होते.

वीस वर्षे दोन्ही भावात एवढा मोठा दुरावा होता मग असे काय घडले की दोघांना निवडणुकीसाठी युती करावी लागली? विधानसभा निवडणुकीत ठाकरे बंधुना मोठे अपयश आले. नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकीत अपयशाची मालिका चालूच राहिली. एकीकडे भाजपाचा अश्वमेध दौडत आहे व महाआघाडीत कोणी भरंवशाचे मित्र नाहीत अशा वातावरणात आपले व आपल्या पक्षाचे अस्तित्व टिकविण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. निदान आपल्या दोन पक्षात तरी मराठी मतांचे विभाजन होऊ नये हा त्यांचा हेतू असावा.

देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे की, ठाकरे म्हणजे मुंबई नाही, ठाकरे म्हणजे मराठी नाही. महापालिका निवडणकीत मुंबईकर महायुतीलाच मतदान करतील, यावर आपला पूर्ण विश्वास आहे.

# मनरेगा बंद



नितीन कैलासराव गोहने
रा. हिरापूर ता. सावली
जि. चंद्रपूर.
8275393387

केंद्रात डॉ. मनमोहन सिंग यांचे युपीए सरकार असताना सन २००५ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना नावाची एक योजना आणली होती. या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना १०० दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याचा कायदा केला होता. या योजनेचा माध्यमातून लोकांना कामे मिळू लागली होती.

ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात लोक शहराकडे धाव घेत असतात, ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी नाहीत, या सबबीखाली लोकांचा थवा शहराकडे धाव घेत असतो.त्यामुळे शहरे वाढली लोकांचा राहण्याचा प्रश्न गंभीर बनला पूर्वी भारत हा खेड्यांचा देश होता महात्मा गांधींनी खेळाकडे चला असा नारा दिला होता. भारताची ७५% जनता खेड्यात, ग्रामीण भागात राहते.त्यामुळे गाव विकासाची आवश्यकता ग्रामीण भागात असते असे महात्मा गांधीजी म्हणत. मनरेगा योजना आणण्याचा हाच विचार होता.

ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतरण थांबवणे मनरेगाच्या माध्यमातून अधिक लोकांना कामे देण्यासोबतच शेतीपूरक कामे सुद्धा या योजनेच्या माध्यमातून केली जात. शेतात विहीर करणे, फळबाग, सिंचन, रस्ते, तलाव यासारखी कामे या योजनेच्या माध्यमातून केली जात असे. ही योजना जनतेच्या कल्याणासाठी मैलाचा दगड ठरली. योजनेच्या माध्यमातून १०० दिवसांच्या रोजगाराची प्रत्येक कुटुंबाला हमी देण्यात आली होती.

मात्र केंद्र सरकारने सध्या सुरू असलेली मनरेगा योजना बंद करून त्या जागी नवीन योजना लागू करण्याचा कायदा संसदेत आणला आहे.विकसित भारत गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन ग्रामीण म्हणजे थोडक्यात जी राम जी असे नाव योजनेला देण्यात आले आहे. थोडक्यात ही योजना जी राम जी या नावाने भविष्यकाळात ओळखली जाणार आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणून नावारूपास आलेल्या या योजनेचे नाव बदलून टाकण्यात आले आहे. महात्मा गांधींच्या नावाने सुरू असलेल्या योजनेतून महात्मा गांधींचे नाव वगळण्यात आले आहे.

केंद्र सरकार कट्टर हिंदुत्वाचा पुरस्कार करीत आलेली आहे. त्यामुळेच नव्या योजनेत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे नाव वगळून जी रामजी योजना आणल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. मात्र विरोधक कितीही ओरडले तरी त्यांचे ऐकायचे नाही हा सत्ताधारी पक्षाचा विचार आहे. त्यामुळे विरोधकांची मागणी पूर्ण होणारी नाही. केंद्र सरकार काँग्रेस सरकारने आणलेल्या योजनांची नावे का बदलवीत आहे ? असा प्रश्न सर्वसामान्य लोकांसमोर उभा आहे.

देशात बेरोजगारी, महागाई, सिंचन, आरोग्य, यासारख्या समस्या आहेत. ग्रामीण भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था आहे.जिल्हा परिषद शाळा मध्ये पुरेसे शिक्षक नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. सरकारला शिक्षक भरती करता आलेली नाही. विद्यार्थी ज्ञानार्जनापासून दूर जात आहेत. सामाजिक समस्यांची यादी मोठी आहे यावर चर्चा होताना दिसत नाही. सरकार नाव बदलविण्यात धन्यता मानीत आहे.

सरकारी योजनांचे नाव बदलविण्यात सरकार आनंदी आहे. अनेक न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची संख्या व कर्मचारी वर्ग अपूरा आहे.न्यायालयामध्ये अनेक खटले वषानुवर्षे खितपत पडून आहेत मात्र त्यावर बोलायला सरकार जवळ वेळ नाही हिंदू मुस्लिम, भारत पाकिस्तान, नेहरू गांधी या विषयावर चर्चा घडवून आणण्याचा सरकारचा विचार दिसतो आहे. या चचार्मुळे सामान्य नागरिकांच्या समस्या कडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सन १९७२ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडलेला होता तेव्हाचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रात रोजगार हमी योजना महाराष्ट्रात सुरू केली होती.

१९७२ च्या दुष्काळ हा जीवघेणा दुष्काळ होता. त्यामुळे लोकांच्या हाताला कामे मिळावीत व लोकांना आर्थिक मदत होऊन दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी या योजनेची सुरुवात करण्यात आली होती. या योजनेच्या माध्यमातून अनेकांना कामधंदा मिळाला होता. त्यामुळे ही योजना मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाली होती.

या योजनेच्या माध्यमातून अनेकांना कामधंदा मिळाला होता. महाराष्ट्र शासनाने सदर योजनेच्या पाठबळ देण्यासाठी १९७७ ला रोजगार हमी योजना कायदा तयार केला होता. तेव्हापासून महाराष्ट्रात या योजनेच्या माध्यमातून लोकांना कामे मिळू लागली.

केंद्र सरकारने २००५ मध्ये नवी योजना लागू केल्यामुळे रोजगार हमी योजनेचे रूपांतर मनरेगात झाले. मनरेगाच्या माध्यमातून व्यवस्थितपणे ग्रामीण भागातील लोकांना कामे मिळत असताना आता नव्या नियमाच्या यात समावेश केला जाणार आहे पूर्वी १०० दिवस लोकांना रोजगार देण्याची निश्चित होते आता १२५ दिवस रोजगार देण्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यांनी ४०% भार खर्च उचलावा अशी अपेक्षा आहे.

राज्यांची आर्थिक परिस्थिती व्यवस्थित नसताना, राज्य आर्थिक दृष्ट्या कर्जबाजारी असताना या योजनेवर राज्यांनी ४०% खर्च करावा असे केंद्र सरकारने नव्या अध्यादेशात म्हटल्यामुळे राज्यांची डोकेदुखी वाढणार आहे. अनेक योजना राज्य पातळीवर सुरू आहेत. निवडणुका जिंकण्यासाठी लाडकी बहीण यासारख्या योजना मुळे राज्याच्या अतिरिक्त खर्च वाढलेला आहे.

अशा परिस्थितीत सध्याची जी राम जी योजना राज्याची डोकेदुखी वाढवणारी आहे. तसेही या योजनेच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षापासून नाहीच्या बरोबरीचे कामे सुरू आहेत.

घरकुल लाभार्थींना या योजनेच्या माध्यमातून घरकुल लाभार्थींना २० हजार रुपये मिळतात. मात्र तेही वेळेवर मिळत नाहीत ही परिस्थिती आहे. हळूहळू मनरेगा योजना बंद होण्याच्या मार्गावर आहे. केंद्र सरकार मनरेगाच्या बदल घडवून धार्मिक ध्रुवीकरण करण्याच्या प्रयत्न केला आहे. ज्यांनी या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली. ज्यांचे जगातल्या १०० देशामध्ये पुतळे आहेत. अनेक देशांनी टपाल तिकिटे काढली अशा महात्मा गांधीच्या नावांची सुरू असलेल्या योजनेच्या नाव बदलून केंद्र सरकार पूज्य महात्मा गांधींच्या अपमान करीत आहे का? असा स्वाभाविक प्रश्न निर्माण झाला आहे.

सुरुवातीला पूज्य बापू अशी योजना आणण्याचा विचार होता ज्यात आता बदल करून जी राम जी योजना आणल्यामुळे अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. काँग्रेस व इतर विरोधी पक्षांनी या संबंधात आंदोलन करण्याच्या इशारा दिला आहे केंद्र सरकार पूर्व बहुमतात असल्यामुळे त्यांना हवे तसे कायदे करता येणार आहे.

मनरेगा ग्रामीण भागाचा आत्मा होती. गेल्या २० वर्षात या योजनेच्या माध्यमातून गरिबांना कामे मिळालीत. लोकांच्या खात्यावर थेट पैसे जमा करण्याची सुरुवात मनरेगाच्या माध्यमातून झाली होती. ग्रामीण भागातील लोकांनी बँकेत खाती उघडण्याची खरी सुरुवात या योजनेच्या माध्यमातून झाली होती. अशी ही योजना केंद्र सरकार बंद करून नव्या स्वरूपात आणण्याच्या प्रयत्न करीत आहे.

राज्यावर ज्यादा भार टाकून राज्यावरील कर्जाच्या डोंगर दिवसागणिक वाढत जाणार आहे. निवडणुका जिंकण्या पुरता योजना ठीक वाटतात. त्यानंतर बजेट कोसळतो तशीच गत या नव्या जी राम जी योजनेच्या माध्यमातून होणार आहे. थोडक्यात मनरेगा बंद करून लोकांच्या रोजगार हिरावण्याच्या सरकारच्या प्रयत्न आहे.

# आदिवासी पाड्यांच्या सर्वांगिण विकासाची खडतर पाऊलवाट



माणूसपणाची पाऊलवाट



सुजाता बंडावार
mahasagarngp@gmail.com

नवव्या वर्गात असताना आपल्याच वगार्तील भिल्ल या आदिवासी समाजाची एक हुशार मुलगी आर्थिक चणचणीतून वह्या, पुस्तके घेऊ शकत नाही, अंगावर घालायला नेटके कपडे नाहीत यामुळे शिक्षण सोडून घरी बसते.

हे जेव्हा सुनिता नागरे यांच्या निदर्शनास आलं तेव्हा त्यांच्या मनावर मोठा परिणाम झाला आणि त्याच क्षणी त्यांनी मनाशी ठरविले की आपण शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व आरोग्यदृष्ट्या मागास असलेल्या आदिवासी पाड्यांसाठी काम करायचे आणि आपल्या निर्णयाला प्रत्यक्षाची जोड देत आदिवासींच्या वेदनेला मायेची पांघरुण घालत त्यांच्या हक्कासाठी त्या अविरतपणे लढा देत आहेत.

सिंधुताई सपकाळ यांच्या सामाजिक कार्याने प्रभावित असलेल्या आणि त्यांच्या सानिध्यात वावरलेल्या सुनिता नागरे यांनी आपल्या कामाची सुरुवात मुंबई, पालघर येथील आदिवासी पाड्यांपासून केली.

आदिवासी समाजावर आधीच सामान्यांकडून झालेला अन्याय, फसवणूक, हडपलेल्या जमिनी, घरे यामुळे ते त्यांच्यापेक्षा वेगळ्या असलेल्या सामन्यांना घाबरत असत व आपल्यापर्यंत पोहोचू देत नसत. तेव्हा सुनिता नागरे यांनी त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांची भाषा, चालीरीती शिकून, त्यांच्यासोबत जमिनीवर बसत त्यांच्यातील एक होऊन गेल्या. सर्वात प्रथम आदिवासी पाड्यावरील मुलांच्या शिक्षणासाठी कार्य सुरू केले.

आदिवासींची आर्थिक परिस्थिती भयावह असल्याने ते आपल्या मुलांना शिक्षण सोडून मोलमजुरीच्या कामाला लावत.अज्ञानामुळे शैक्षणिक जागृती त्यांच्यामध्ये नव्हती. तेव्हा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी मार्गदर्शन शिबिरे घेतली. या मुलांच्या वह्या, पुस्तके, गणवेश यासाठी लोक सहभागातून निधी उभा केला. विद्यार्थ्यांच्या गरजा आणि शाळांमधील अपुरी साधने याची पूर्तता घडवून आणण्यासाठी आणि हे काम अधिक प्रभावी होण्यासाठी त्यांनी अभिषेक शैक्षणिक सामाजिक संस्था अंधेरी मुंबईची स्थापना केली. या संस्थेद्वारे त्यांच्याशी आज हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते जुळले आहे.

शैक्षणिक बाबीसोबतच आदिवासींचे आरोग्य आणि त्यांची आर्थिक स्थिती यावरही काम करणे आवश्यक होते. यावेळी त्या आपला अनुभव सांगताना म्हणतात की, आदिवासी स्त्रिया या मासिक धर्माच्या वेळी कापड किंवा गोणपाट वापरत असत. तेव्हा त्यांना सॅनिटरी पॅड वापरण्यासंदर्भात मार्गदर्शन करायचे होते आणि त्यांच्याकडून आधार कार्ड घ्यायचे होते. पण ह्या अनोळखी बाई आपले आधार कार्ड घेऊन आपली फसगत करतील आपल्या घरावर कब्जा करतील म्हणून त्यांनी सुनिता नागरे यांचा विरोध केला.

पण हा त्रास, सुनीता यांच्या अथक प्रयत्नाने हळूहळू कमी झाला आणि त्यांचा विश्वास संपादित करीत आज प्रत्येक महिन्याला दोन हजार महिलांना सॅनिटरी नॅपकिन्स पुरविण्यात येत आहे असे त्या मोठ्या अभिमानाने सांगतात. त्यांनी गरोदरपणी व मासिक पाळीच्या वेळी कोणता पोषक आहार घ्यावा, प्रथमोपचार, सुदृढ आरोग्य, कुपोषण यासंबंधी आरोग्य विषयक शिबिरे लावली.

या त्यांच्या कार्यामध्ये आज अनेक डॉक्टर्स सुद्धा आपली सेवा देत आहेत. आदिवासी पाड्यांवर कुपोषण हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. अंगणवाडी आणि शालेय मध्यान्ह भोजनातून दिला जाणारा आहार हा पुरेसा पूरक नाही त्यांना प्रोटीन युक्त आहार देण्यात यावा यासाठी त्या शासनाकडे पाठपुरावा करीत आहे.

आता प्रश्न उरला तो त्यांच्या आर्थिक उन्नतीचा. आर्थिक उन्नती झाली तरच शैक्षणिक व आरोग्याचा दर्जा उंचावू शकतो या भावनेतून त्यांनी महिलांना शिलाई मशीन, इमिटेशन ज्वेलरी, ड्रायविंग, बांबूपासून हस्तकला, वारली पेंटिंग असे प्रशिक्षण दिले.

आज महिला मुंबई, पालघर या ठिकाणी गाड्या चालवून उदरनिर्वाह करीत आहेत, तयार केलेल्या वस्तूंचे स्टॉल्स लावून मोठ्या प्रमाणात विक्री करीत आहे. त्यांचे हे काम पाहून अनेक सधन व्यक्ती त्यांना आर्थिक सहाय्य करीत आहे.

आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक उन्नतीसाठी सुनिता नागरे गेल्या बारा वर्षांपासून मुंबई, पालघर, ठाणे, नाशिक, रायगड गडचिरोली, धुळे, हिंगोली या आदिवासी पाड्यावर अविरत भटकंती करीत आहेत.

हे काम करीत असताना अनेक प्रस्थापितांचा त्यांना विरोध झाला. तेव्हा मी माज्या संवादकौशल्यातून मी माझे उद्दिष्ट मांडते आणि प्रयत्नांकी परमेश्वर या म्हणीप्रमाणे हा विरोध ओसरतो. आज माझ्या प्रोत्साहनातून १२ वर्षांपूर्वीच्या तुलनेत आदिवासींच्या परिस्थितीमध्ये ९०% सुधारणा झाली आहे असे त्या मोठ्या अभिमानाने सांगतात. रोजंदारीवर काम करणारी मुले शाळेच्या प्रवाहात आलेली आहे.

ही मुले पोलीस स्टाफ, महानगरपालिका कार्यालय व विविध कंपन्यांमध्ये मोठ्या पदावर कार्यरत आहेत. महिला शिलाई, इमिटेशन ज्वेलरी, ड्रायव्हिंग यातून उदरनिर्वाह करीत आहेत. आज आदिवासी महिला स्वतःहून सॅनिटरी पॅडची मागणी करतात. आरोग्य शिबिरासाठी बोलवितात.

हे सर्व करीत असताना सकारात्मक दृष्टिकोन, कामाची तळमळ आणि पती सचिन नागरे, मुलगी ऋतुजा नागरे, मुलगा अभिषेक नागरे यांच्या पूर्ण पाठिंब्यांनी या पाड्यांवर मी अविरत भटकंती करू शकत आहे. भविष्यातील योजनांबद्दल त्या सांगतात की गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींच्या पाड्यांवर काम करणे बाकी आहे. आगामी काळात तेथील महिलांसाठी शिलाई मशीन प्रशिक्षण आणि लहान मुलांसाठी प्ले नर्सरी काढायची आहे.

मी माझ्या कायार्साठी कोणतीही सरकारी मदत घेतली नाही असे सांगत त्या म्हणतात की आदिवासींच्या सरकारी योजना या केवळ कागदावर असतात आणि कागदपत्रांच्या अभावी या योजना आदिवासीपर्यंत पोहोचत नाही. तेव्हा या योजनेचा लाभ मिळावा यासाठी आदिवासींना प्रशिक्षित करण्यात येते.

सुनिता नागरे यांच्या अथक प्रयत्नातून आणि तळमळीतून आज आदिवासी पाड्यावरील परिस्थितीत आमुलाग्र बदल झाला आहे.माज्या कायार्तून मी त्याचं जीवन सुसह्य करून त्यांच्या वेदनांवर फुंकर घालू शकत आहे यात माज्या जीवनाचा अर्थ सामावला आहे असे त्या मोठ्या समाधानाने म्हणतात. त्यांचं कार्य अधिक व्यापक प्रमाणात व्हावे यासाठी त्या आर्थिक मदतीचे आवाहन करीत आहेत. त्यांच्या या कार्याला भरघोस यश येवो यासाठी शुभेच्छा.

-----------------

सुनिता नागरे
संपर्क क्रमांक 7977868618

## शाबासकीची थाप!

वाचक लिहितात

शाबासकी ही कुणालाही दिली जाऊ शकते. यात वयाचे कुठलेही बंधन नसते. शाबासकी ही पाठीवर दिली जाते. हाच सर्वात मोठा पुरस्कार असतो. यात बुक्के सन्मानपत्र, मानपत्र इत्यादी चा समावेश नसतो. यात निव्वळ आपुलकीची भावना असते. कुठलाही अभिनीवेश नसतो. मौनातून योग्य तो संदेश दिला जातो. शाबासकी ही कुठल्याही क्षेत्रात चांगली, गौरवास्पद कामगिरी केल्याचे निदर्शक असते. शाबासकी ही आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या लोकांकडून, गुरूजनां कडून मिळाल्यास यातून मिळणारा आनंद हा अवर्णनीय असतो. याला कुठल्याही गोष्टीची बाधा पोहचत नसते. हा आनंद कुणी हिरावून पणं घेऊ शकत नाही. शाबासकी पाठीवर मिळत असल्याने आपली पाठ आणि मान ताठ झाल्याशिवाय राहणार नाही.

शाबासकी मिळण्याच्या प्रमाणात आज कमी आलेली पहायला मिळते आहे. आज कुठल्याही क्षेत्रात यश मिळवले गेले की प्रमाणपत्र व शिल्ड ची भरमार झालेली पहायला मिळते आहे. यात सन्मान कमी आणि प्रदर्शन मोठ्याप्रमाणावर असते . यामुळे आपल्या कायार्चा उचित गौरव होत नाह . कारणं यात आपुलकीची भावना नसते. तर एक सोपस्कार पहायला मिळत असतो.

एखाद्या खेळामध्ये कुणी बाजी मारली की शाब्बास रे पट्ठे असा उदगार तोंडून सहज निघत असतो. आज असे घडून येत नाही. स्पर्धा असली पाहिजे पणं ती निकोप असली पाहिजे. ती विकारी नको. तर प्रोत्साहन देणारी असावी. कुणाचेही हक्क हिरावून घेणारी नसावी. स्पर्धेतून मिळणारा आनंद हा सर्वांमध्ये वाटल्या गेला पाहिजे. कुणाच्या यशात बाधा आणता कामा नये. दिलेल्या शब्दाला किंमत असावी. तरच शब्दाला वजन प्राप्त होते. आज याचाच अभाव सर्वत्र दिसून येतो आहे. दिखाव्याचे महत्व वाढल्याने जीवनातील निखळ आनंद लोप पावला गेला आहे.

पाठीवरील मायेची एक थाप किती मोलाची होती ते आजच्या दुषित वातावरणात कळणे कठीण काम झाले आहे. कुठल्याही मोठ्या पुरस्कारापेक्षा गुरूजणांकडून, आईवडीलांकडून, मोठ्या माणसांकडून मिळालेली शाबासकीची थाप ही लाख मोलाची असते. प्रोत्साहन आणि जीवनाला कलाटणी देणारी असते. हे विसरून कसे चालणार!

■ मिलिंद गड्डमवार
राजुरा, चंद्रपूर. 9511215200

## पुन्हा एकदा सुजलाम् सुफलाम्

भारत हा कृषिप्रधान देश आहे वातावरणातील बदल, रसायना चा वापर, बनावट बी बियाणे यामुळे भूमीचा कस पूर्णता जाऊन ती नापीक बनण्याच्या स्थितीत ला आली आहे. त्याचा परिणाम अन्नदाता शेतकरी यांच्या जीवनावर झाला आहे. नापीकी, कर्जबाजारी यामुळे तो आत्महत्या करू लागला आहे. शासनाने 2022 - 23 पर्यंत शेतीचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा केली होती त्याला केवळ पाच राज्यातच यश मिळाले. केंद्र शासनाने 2022 पासून नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणाऱ्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे, नैसर्गिक खताला चालना देणे, युरियाला कडूलिंबाचे तेल लावणे, कृषी सिंचन, सौर पंप, शेती पतपुरवठा, नैसर्गिक शेतीला आर्थिक सहाय्य देणे, शून्य भांडवलात नैसर्गिक शेती करणे, सकस आणि चांगले बी बियाण्यांचा पुरवठा करणे इत्यादी योजना सुरू केल्या आहेत.

राज्यातही पुढील दोन-तीन वर्षात 25 लाख हेक्टर भूमी नैसर्गिक शेती खाली आणण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे 'आशियाई बियाणे परिषद 2025' च्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्र्यांनी सांगितले. देशातील पहिले 'कृषी ए आय' धोरण त्यांनी घोषित केले. त्याच्या उपयोगाने शेती अधिक पूवार्नुमानक्षम आणि उत्पादनक्षम करण्याचा शासनाचा मानस असल्याचेही सांगितले. नैसर्गिक शेतीच्या धोरणातून उत्पादकता वाढून उत्पादन खर्च कमी करणे हे लक्ष आहे. त्यातून होणारे अन्य लाभ हे देशाचा खरा विकास करून देणारे आहेत. पर्यायाने शेतकरी आपत्कालीन संकटाला तोंड देण्यास सक्षम बनेल. गोवंशियांचे महत्त्व, वृद्धी आदी होऊन पयार्यी सर्वच उद्योग वाढवून सफलता मिळेल. गोधनाचा वापर वाढल्याने त्यांचे रक्षण होईल. सेंद्रिय शेतीमुळे अन्यधान्य सात्विक आणि सकस होऊन समाज रोगमुक्त होईल.

कृत्रिम खते, खोटे बियाणे, फळांवर रसायने लावणे आधी संबंधित सर्वच प्रकारांवर आळा बसेल. अनेक प्रकारचे प्रदूषण टाळून गाव स्वच्छ आणि स्वयंपूर्ण होण्यासही सहाय्य होऊ शकते आणि देशाला पूर्वीचे दिवस परत यायला मोठाच हातभार लागेल. सर्क्युलर इकॉनोमी असणारे समृद्ध गावाचे स्वप्न देखील साकार होईल. या सवार्चा परिणाम अंतिमतः व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या उन्नतीसाठी होणार आहे. शेतकरी आणि राष्ट्र यांच्या विकासासाठी योजनांवर लक्ष केंद्रित करणे ही खऱ्या अर्थाने भारताला महासत्ता बनविण्यासाठी ची पायाभूत गोष्ट ठरेल.

■ लीना मकरंद गाडगीळ पनवेल.

## नाभीमध्ये झोपताना हे तेल टाकल्यास होतील हजारो फायदे



नाभी आणि शरीराच्या आरोग्याचा संबंध प्राचीन आयुवेर्दात विशेष महत्त्वाचा मानला जातो. नाभी हे शरीराचे केंद्र मानले जाते, कारण गर्भावस्थेत याच नाभीतून आईकडून बाळाला अन्न व पोषण मिळते. आयुवेर्दानुसार नाभी हे पचनसंस्थेशी थेट संबंधित आहे.

नाभी परिसरातील बिघाडामुळे अपचन, गॅस, बद्धकोष्ठता यांसारख्या तक्रारी होऊ शकतात. नाभीत योग्य तेल लावल्यास पचन सुधारते, शरीरातील कोरडेपणा कमी होतो आणि उष्णता संतुलित राहते, असे मानले जाते. आधुनिक वैद्यकशास्त्रात नाभीत तेल लावल्याचे ठोस वैद्यकीय पुरावे मर्यादित आहेत. त्यामुळे नाभीची स्वच्छता राखणे, संसर्ग टाळणे आणि आरोग्याकरिता योग्य आहार, व्यायाम व जीवनशैली पाळणे हे अधिक महत्त्वाचे ठरते.

नाभी ही अशी जागा आहे जिथून बाळाला गर्भाशयात असताना आईकडून पोषण मिळते. आयुवेर्दात ते शरीराचे केंद्रही मानले गेले आहे. फक्त ते स्वच्छ करून आणि तेल लावून तुम्ही आरोग्याशी संबंधित अनेक समस्या टाळू शकता. तसे तुम्ही शुद्ध गाईचे तूप, मोहरीचे तेल किंवा नारळाचे तेल नाभीमध्ये लावू शकता. त्याचे बरेच फायदे दिसून येतात.

**एरंडेल तेल** : हे त्याच्या नैसर्गिक रेचक गुणधर्मांसाठी ओळखले जाते. असे मानले जाते की नाभीची मालिश केल्याने पाचन तंत्राची क्रिया वेगवान होते आणि गॅसची समस्या दूर होते. बऱ्याच पारंपारिक पद्धतींमध्ये, नाभीला शरीराचा डिटॉक्सिफिकेशन पॉईंट म्हणतात. एरंडेल तेलात असलेले रिकिनोलिक ॲसिड त्याचे सहाय्यक मानले जाते, जे जळजळ आणि विष कमी करण्यास मदत करू शकते. येथे मसाज केल्याने हार्मोनल बॅलन्स वाढण्यास मदत होते.

**तणाव आणि चिंता कमी करणे** : बेंबीवर एरंडेल तेल लावल्याने पॅरासिम्पेथेटिक मज्जासंस्था सक्रिय होते, ज्यामुळे शरीराला आराम मिळतो आणि तणाव कमी होतो. एरंडेल तेलाची खोल मॉइश्चरायझिंग क्षमता त्वचेला मऊ आणि पोषित बनवते. हे नाभीवर लावल्याने पोटाची त्वचा मऊ आणि हायड्रेटेड राहते.

तेल हजारो वर्षांपासून वापरले जात आहे. ते इजिप्त, ग्रीस आणि रोम सारख्या सभ्यतेतही लोकप्रिय होते. आयुर्वेदात पिचोटी ग्रंथीचा उल्लेख आहे, ज्याला नाभीमागील महत्त्वाचे केंद्र म्हटले जाते. परंतु आधुनिक विज्ञानानुसार अशा ग्रंथीच्या अस्तित्वाचा पुरावा नाही.

नाभीवर एरंडेल तेलाच्या मालिशच्या फायद्यांविषयी पुरेसे वैज्ञानिक संशोधन उपलब्ध नाही. नाभीमध्ये तेल टाकण्याची पद्धत आयुर्वेद आणि लोकपरंपरेत आढळते. याला पीचोटी थेरपी असेही म्हटले जाते. फायदे सांगितले जातात, तसेच काही तोटेही लक्षात घ्यायला हवेत.


नाभीमध्ये तेल टाकणे हे पूरक उपाय मानावे, उपचार म्हणून नव्हे. आरोग्यासाठी संतुलित आहार, व्यायाम आणि योग्य वैद्यकीय सल्ला हेच अधिक महत्त्वाचे आहेत.

**फायदे** : नाभीत तेल टाकल्याने शरीरातील कोरडेपणा कमी होतो असे मानले जाते. बद्धकोष्ठता, गॅस किंवा पोटात जळजळ कमी होण्यास मदत होते असा काहींचा अनुभव आहे. नारळ किंवा बदाम तेलामुळे त्वचा मऊ राहण्यास मदत होते. झोप सुधारण्यास आणि तणाव कमी होण्यास काही प्रमाणात उपयोग होतो असे मानले जाते. आयुर्वेदानुसार नाभी मणिपूर चक्राशी संबंधित असल्याने ऊर्जा संतुलन राखले जाते.

**तोटे** : याचे ठोस वैज्ञानिक पुरावे आधुनिक वैद्यकशास्त्रात उपलब्ध नाहीत. नाभी स्वच्छ नसेल तर संसर्ग होण्याचा धोका असतो. खूप जास्त किंवा चुकीचे तेल वापरल्यास त्वचेवर खाज, पुरळ होऊ शकते. गर्भवती महिला, मधुमेही रुग्ण किंवा त्वचारोग असणाऱ्यांनी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### जीवनाचा ७ / १२

नकारात्मक विचारांना
मनी देऊ नये थारा
त्यामुळेच तर बदलतो
जीवनाचा सात -बारा..

नकारात्मक विचार
का आले मनी
त्याच्या निराकरणार्थ
करावी निरपेक्ष चाचपणी..!

तथ्यहीन विचारांनी
मनात मांडले ठाण
तर आयुष्यभर राहतो
मनावर ताण तणाव ..!

टेन्शन येता मनावर
बिघडू शकते संतुलन
अप्रिय घटनेत त्याचे
होऊ शकते परिवर्तन ..!

## स्मार्टफोन, सोन्याच्या नाण्यासह एकाच कार्टमध्ये ५ लाखाची खरेदी




■ **नागपूर :** ऑरेंज सिटी नागपूर आता भारतातील वेगाने वाढणाऱ्या कन्झव्हिनियन्स-कॉमर्स शहरांपैकी एक ठरत आहे. भारतातील अग्रगण्य क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्म इन्स्टामार्टने आपल्या वार्षिक ग्राहक ट्रेंड अहवालाची पाचवी आवृत्ती हाऊ इंडिया इंस्टामार्टेड जाहीर केली असून, नागपूरच्या ऑर्डर्समध्ये वर्षभरात तब्बल ८४+ टक्के वाढ नोंदली गेली आहे.

याच वर्षी नागपूरमधील एका ग्राहकाने एकाच कार्टमध्ये स्मार्टफोन, सोन्याची नाणी आणि मांजरांचे खाद्य खरेदी करत ४.९ लाख रुपये खर्च केल्याची नोंद या अहवालाची वैशिष्ट्य ठरली आहे.

इलेक्ट्रॉनिक्स आणि उपकरणांच्या खरेदीत ५०२+ टक्क्यांची उसळी पाहायला मिळाली असून, यामुळे शहरातील ग्राहक प्रीमियम तंत्रज्ञानाकडे अधिक झुकत असल्याचे स्पष्ट होते. त्याचबरोबर क्रीडा व फिटनेस श्रेणीत ५१३+ टक्के वाढ नोंदली गेली आहे. रेसिस्टन्स बँड्स, डम्बेल्स आणि योगाचे साहित्य हे नव्या काळातील आवश्यक घटक बनले आहेत.

हेल्थ व वेलनेस ही श्रेणी देशपातळीवर वेगाने पुढे येणाऱ्या प्रमुख विभागांपैकी एक ठरली असून, या लाटेत नागपूरही सहभागी झाले आहे. नागपूरच्या ग्राहकांचा आत्मविश्वास त्यांच्या कार्टमधूनही दिसून आला. वर्षभरात अनेक ग्राहकांनी ४ लाख रुपयांहून अधिक खर्च केला. यावर्षी कार्टमध्ये सर्वाधिक महागड्या वस्तूंमध्ये आयफोन १७ मॉडेल्सचाही समावेश होता. यामुळे नागपूर एक उभरते टेक-पॉवरहाऊस म्हणून ओळख निर्माण करत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

स्विगीचे चीफ बिझनेस ऑफिसर हरी कुमार म्हणाले, भारतात क्विक कॉमर्स आता केवळ सोयीपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो आधुनिक भारतीय जीवनशैलीचा एक अविभाज्य भाग बनला आहे. सुरुवातीला शेवटच्या क्षणी लागणाऱ्या वस्तू किंवा अचानक होणाऱ्या खरेदीपुरता मर्यादित असलेला हा प्रवास आता नियोजित खरेदी आणि मोठ्या किमतीच्या वस्तूंपर्यंत पोहोचला आहे.

तातडीची गरज असो, थोडी लक्झरी खरेदी असो किंवा रोजच्या वापरातील वस्तू असोत, लोकांना जे काही हवे आहे त्यासाठी इन्स्टामार्ट एक विश्वासार्ह भागीदार म्हणून स्वतःला सिद्ध करत आहे. आमच्याकडून अपेक्षित असलेली वेगवान आणि विश्वासार्ह सेवा देत राहणे, हेच आमचे वैशिष्ट्य असल्याचेही ते म्हणाले.

## क्रोमाच्या मते भारत प्रीमियम आणि आरोग्याप्रती जागरूक

■ **मुंबई :** टाटा समूहाचा विश्वासार्ह ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर क्रोमाने त्यांचा 'इयर-एंड कन्ज्युमर ट्रेंड्स २०२५' अहवाल प्रसिद्ध केला.

अहवालातील प्रमुख निष्कर्षांनुसार, भारतीय ग्राहक आता क्रोमाच्या देशभरातील ऑफलाइन आणि ऑनलाइन नेटवर्कमध्ये मल्टी-ब्रँड लार्ज-फॉरमॅट स्टोअर्स, प्रीमियम फीचर्स, स्मार्ट सुविधा आणि आरोग्य-केंद्रित डिव्हाइसेसना प्राधान्य देत आहेत.


क्रोमाच्या 'इयर-एंड कन्ज्युमर ट्रेंड्स २०२५' नुसार, एकूण स्मार्टफोन विक्रीत वर्षानुवर्षे लक्षणीय वाढ झाली, परंतु लक्षणीय बाब ग्राहकांच्या वर्तनात बदल आहे. विकल्या जाणाऱ्या प्रत्येक तीन नवीन फोनपैकी एक प्रीमियम २०,०००-३०,००० बँडमध्ये होता आणि जवळजवळ पाचपैकी एक फ्लॅगशिप किंवा सुपर-फ्लॅगशिप मॉडेल होता. विशिष्ट किंमत ब्रॅकेटमध्ये विक्रीत ३००% पेक्षा जास्त वाढ झाली. भारत खरोखरच 'डिजिटल-फर्स्ट' देश बनला आहे, जिथे कंटेंट क्रिएटर्सची वाढती संख्या, गेमिंगची आवड आणि एआय आणि प्रगत कॅमेरा वैशिष्ट्ये ग्राहकांसाठी सर्वोच्च प्राधान्ये बनत आहेत.

लॅपटॉप बाजारपेठेत एकूणच प्रभावी दुहेरी-अंकी वाढ दिसून आली आहे, ज्यामध्ये प्रत्येक श्रेणीमध्ये प्रीमियम अनुभवांकडे स्पष्टपणे बदल झाला आहे. एआय पीसी आता जेन झेडच्या हसल इकॉनॉमी आणि जेन अल्फा च्या एआय-नेटिव्ह जीवनशैलीला आकार देत आहेत. ॲपलच्या एम४ चिपने प्रीमियम बेंचमार्क सेट केला आहे, तर एनव्हीआयडीएने गेमिंग जगात महत्त्वपूर्ण प्रभाव पाडला आहे.

यासह, लॅपटॉपची एक नवीन श्रेणी उदयास आली आहेः एआय-सक्षम, एआय नेक्स्ट-जेन आणि गेमिंग पीसी. भारतातील सिलिकॉन ट्रायड बेंगळुरू, मुंबई आणि दिल्ली या एआय-फर्स्ट लाटेचे नेतृत्व करत आहेत. हा तांत्रिक उत्क्रांतीच्या एका नवीन युगाचा संकेत आहे, जिथे लॅपटॉप आता अतुलनीय शक्ती आणि उत्तम कार्यक्षमता यांचा मिलाप घडवून आणतात.

गेमिंग लॅपटॉपच्या विक्रीत २५% पेक्षा जास्त वाढ झाली, उच्च-कार्यक्षमता असलेल्या व्यावसायिक मॉडेल्समुळे, गेमिंग लॅपटॉपच्या विक्रीत २५% पेक्षा जास्त वाढ झाली, जी गेमर्सना प्रगत क्षमतांसाठी असलेल्या पसंतीचे प्रतिबिंबित करते. नॉन-गेमिंग विभागात, अल्ट्रा-थिन लॅपटॉप हे प्रमुख वाढीचे चालक म्हणून उदयास आले, विक्रीत २ पट वाढ झाली.

## विराटचा अपमान आणि संजयची बाजू



■ **मुंबई :** सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान)ची गोष्ट सांगितली आहे. अन्विता आता केवळ जगण्याचा नाही, तर स्वतःच्या जीवनाचा विचार करू लागली आहे. संजय (ऋषी सक्सेना) च्या मनातील वाढती असुरक्षितता आणि विराटच्या (रजत वर्मा) वागण्याचा उलगडा होत नसल्याने तिची स्थिती गोंधळलेली आहे.

त्यातच रजतचे वडील राजनाथ वर्मा (फारूख सईद) यांच्या आग्रही स्वभावामुळे गुंतागुंत आणखी वाढली आहे. अन्वितावर निवड करण्याची पाळी आली आहे आणि त्यात तिच्या सक्षमतेची आणि नात्यांची परीक्षा होणार आहे.

पुढील कथानकात विराटचे माता-पिता त्यांच्या घरी, संजयच्या वरिष्ठाचा म्हणजे कमिशनरचा सत्कार करण्यासाठी एक कार्यक्रम आयोजित करतात. स्वतःला सिद्ध करण्यासाठी आणि आपल्या वडिलांसमोर स्वतःची पात्रता दाखवण्यासाठी विराट सुहास निवासमधील सर्वांना आपल्या रॉबिन हूड मित्रांसोबत आमंत्रित करतो.

दरम्यान, कमिशनर संजय आणि त्याच्या कुटुंबाला देखील ते आमंत्रण पाठवतो, जे अन्विताला माहीत नसते. आपल्या बॉसला खुश ठेवण्यासाठी संजय ही माहिती अन्वितापासून लपवतो.

# विजय हजारे ट्रॉफी, पहिल्या दिवशी २२ शतके लागली

■ महासागर प्रतिनिधी
क्रीडा डेस्क, दि. २५:



विजय हजारे ट्रॉफीच्या सध्याच्या हंगामाची सुरुवात बुधवारी झाली. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी २२ खेळाडूंनी शतकी खेळी केल्या. एक द्विशतकही झळकावले गेले. स्पर्धेच्या इतिहासात एका दिवसात झळकावलेली ही सर्वाधिक शतके आहेत. यापूर्वी हा विक्रम १२ डिसेंबर २०२१ आणि ३ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या १९ शतकांचा होता.

विग्नेश पुथुरने ६ झेल घेतले, केरळच्या विग्नेश पुथुरने त्रिपुरा विरुद्धच्या सामन्यात उत्कृष्ट क्षेत्ररक्षण करत ६ झेल घेतले. यापैकी एक झेल त्याने स्वतःच्याच गोलंदाजीवर घेतला. यासोबतच तो पुरुष लिस्ट-अ क्रिकेटमध्ये एका सामन्यात ६ झेल घेणारा पहिला खेळाडू ठरला.

पहिल्या दिवशी बिहारचा सामना अरुणाचल प्रदेशशी झाला. बिहारच्या डावात वैभव सूर्यवंशी (१९०), साकिबुल गनी (१२४) आणि आयुष लोहारुका (११६) यांनी शतके झळकावली. विजय हजारे ट्रॉफीमध्ये एका संघाच्या डावात तीन फलंदाजांनी शतके झळकावण्याची ही पहिलीच वेळ होती. बिहारने एकूण ३८ षटकार मारले, जे कोणत्याही पुरुष लिस्ट-अडावातील सर्वाधिक आहेत.

कर्नाटकने सर्वात मोठी धावसंख्या यशस्वीरित्या पार केली या स्पर्धेत कर्नाटकने झारखंडविरुद्ध ४१३ धावांचे लक्ष्य गाठून विजय हजारे ट्रॉफीमधील सर्वात मोठी धावसंख्या यशस्वीरित्या पार केली. तर, ओडिशाच्या स्वस्तिक समलने २१२धावांची खेळी केली, मात्र त्याचा संघ सामना हरला.

मोसूने ९ षटकांत ११६ धावा दिल्या अरुणाचल प्रदेशच्या गोलंदाजांसाठी हंगामातील पहिला सामना खूपच कठीण ठरला. बिहारविरुद्ध मिबोम मोसूने ९ षटकांत ११६ धावा दिल्या, जे पुरुष लिस्ट-अ क्रिकेटमध्ये कोणत्याही गोलंदाजाने दिलेल्या सर्वाधिक धावा आहेत. इतर दोन गोलंदाजांनीही ९०पेक्षा जास्त धावा दिल्या.

बिहारने ५७४ धावा केल्या, लिस्ट-अ मधील सर्वात मोठा स्कोअरअरुणाचल प्रदेशविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात बिहारने ५० षटकांत ६ गडी गमावून ५७४ धावा केल्या, जो पुरुष लिस्ट-अ क्रिकेटमधील आतापर्यंतचा सर्वात मोठा स्कोअर आहे. लिस्ट-अ क्रिकेटमध्ये दुसऱ्यांदाच असे घडले आहे की एखाद्या संघाने ५०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

यापूर्वी २०२२ मध्ये तामिळनाडू क्रिकेट संघाने अरुणाचल प्रदेशविरुद्ध ५०५ धावा केल्या होत्या. आता त्याच संघाविरुद्ध बिहारने ५७४ धावा करून तो विक्रमही मागे टाकला आणि नवीन जागतिक विक्रम आपल्या नावावर केला. सूर्यवंशी आणि साकिबुल गनीचा धमाकाअरुणाचल प्रदेशविरुद्धच्या सामन्यात वैभव सूर्यवंशी आणि साकिबुल गनीने अनेक मोठे विक्रम मोडले. सूर्यवंशीने केवळ ५९ चेंडूंमध्ये १५० धावा पूर्ण केल्या, जो पुरुष लिस्ट-अ क्रिकेटमधील सर्वात वेगवान १५० धावांचा विक्रम आहे. त्याने एबी डिव्हिलियर्सचा विक्रम मोडला.

तर साकिबुल गनीने ३२ चेंडूंमध्ये शतक झळकावून भारतीय खेळाडूंमध्ये लिस्ट-अ मधील सर्वात वेगवान शतक केले. हे पुरुष लिस्ट-अ क्रिकेटमधील तिसरे सर्वात वेगवान शतक देखील आहे.

## बुमराह-पंतने मागितली माफी

■ महासागर प्रतिनिधी
क्रीडा डेस्क, दि. २५:



दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेंबा बावुमा याने भारताच्या विरोधात पहिल्या कसोटी सामन्यादरम्यान झालेल्या वादावर प्रतिक्रिया दिली आहे. त्याने सांगितले की, भारतीय खेळाडू जसप्रीत बुमराह आणि ऋषभ पंत यांनी सामन्यानंतर त्याची माफी मागितली होती. बुमराह आणि पंत यांनी बावुमाला 'बौना' (खुजा) म्हटले होते.

ही घटना कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशीची आहे. बुमराहने बावुमाला छइह बाद देण्याची अपील केली, जी पंचांनी फेटाळली. यानंतर बुमराह आणि पंत डीआरएसबद्दल चर्चा करत होते, याच दरम्यान स्टंप माईकमध्ये त्यांचे बोलणे रेकॉर्ड झाले, जे सोशल मीडियावर व्हायरल होऊन वादाचे कारण बनले. यात बुमराह आणि पंत बावुमाला 'बौना' (खुजा) म्हणताना ऐकू आले.

दक्षिण आफ्रिकेने भारताला २-० ने कसोटी मालिका हरवली होती. मालिका जिंकल्यानंतर कर्णधार बावुमा (डावीकडे) यांना प्रशिक्षक शुक्री कॉनराड अभिनंदन करताना. दक्षिण आफ्रिकेने भारताला २-० ने कसोटी मालिका हरवली होती. मालिका जिंकल्यानंतर कर्णधार बावुमा (डावीकडे) यांना प्रशिक्षक शुक्री कॉनराड अभिनंदन करताना. मीडिया मॅनेजरने त्यांना याबद्दल सांगितले

आपल्या क्रिकइन्फो कॉलममध्ये बावुमाने लिहिले की, त्याला त्यावेळी या टिप्पणीबद्दल माहिती नव्हती. नंतर संघाच्या मीडिया मॅनेजरने त्याला याबद्दल सांगितले. बावुमाच्या मते, बुमराह आणि पंत दोघांनीही त्याची माफी मागितली. ते म्हणाले, मैदानावर जे घडते ते तिथेच राहते, पण काय बोलले गेले हे तुम्ही विसरत नाही. अशा गोष्टी प्रेरणा आणि ऊर्जेचा स्त्रोत बनू शकतात, पण यामुळे कोणीही दीर्घकाळ वैर ठेवत नाही.

बावुमा म्हणाला की, भारताविरुद्धची मालिका नेहमीच कठीण आणि रोमांचक असते. या वादामुळे खेळाडूंमध्ये परस्पर आदर कायम राहिला, असे त्याने स्पष्ट केले. बावुमाच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेने भारताला कसोटी मालिकेत २-० ने हरवले होते. दक्षिण आफ्रिकेने कसोटी मालिका जिंकून २००० नंतर पहिल्यांदाच ही कामगिरी केली.

दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाचा अजिंक्य विक्रम कायम आहे. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने आतापर्यंत एकही कसोटी सामना गमावलेला नाही. बावुमाने आपल्या कर्णधारपदाच्या १२ सामन्यांपैकी ११ जिंकले आहेत.

## हॉकीपटू सिंगला खेळ रत्न मिळणार

### चेस वर्ल्ड चॅम्पियन दिव्यासह २४ खेळाडूंना अर्जुन पुरस्काराची शिफारस

■ महासागर प्रतिनिधी
नवी दिल्ली, दि. २५:



भारतीय हॉकी संघाचे उपकर्णधार हार्दिक सिंग यांना २०२५ चा मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार मिळेल. हार्दिक हे एकमेव खेळाडू आहेत, ज्यांच्या नावासाठी निवड समितीने शिफारस केली आहे.

२७ वर्षीय हार्दिक सिंग टोक्यो २०२१आणि पॅरिस ऑलिम्पिक २०४१ मध्ये पदक जिंकणा?या भारतीय संघाचा भाग होते. त्यांनी या वर्षी आयोजित आशिया कपमध्ये सुवर्णपदक जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

बुधवारी निवड समितीच्या बैठकीत अर्जुन पुरस्कारासाठी नावांची शिफारस करण्यात आली. यात क्डअ चे उपाध्यक्ष गगन नारंग, माजी बॅडमिंटनपटू अपर्णा पोपट आणि माजी हॉकीपटू एमएम सोमय्या यांचा समावेश होता.

समितीने बुद्धिबळपटू दिव्या देशमुख आणि डेकॅथलॉन ?थलीट तेजस्विन शंकर यांच्यासह २४ खेळाडूंना अर्जुन पुरस्कारासाठी निवडले आहे. यावेळी क्रीडा पुरस्कारांच्या यादीत कोणत्याही क्रिकेटपटूचे नाव नाही. योगासन खेळाडूला पहिल्यांदा अर्जुन पुरस्कार मिळाला योगासन खेळाशी संबंधित खेळाडू आरती पाल यांना अर्जुन पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली आहे. क्रीडा मंत्रालयाकडून मान्यता मिळाल्यानंतर ५ वर्षांनी कोणत्याही योगासन खेळाडूची निवड झाली आहे. आरती सध्या राष्ट्रीय आणि आशियाई चॅम्पियन आहेत. योगासनला २०२६ च्या आशियाई खेळांमध्ये प्रात्यक्षिक खेळ म्हणून समाविष्ट केले जाईल.

## रेप केसमध्ये क्रिकेटर यश दयालला अटकेची शक्यता

■ महासागर प्रतिनिधी
जयपूर, दि. २५:

आयपीएल चॅम्पियन रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु (फछइ) चा वेगवान गोलंदाज यश दयाल याला अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याच्या प्रकरणात जयपूरच्या पॉक्सो कोर्टातून धक्का बसला आहे. जयपूर महानगर प्रथमच्या पॉक्सो कोर्ट-३ ने यशचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. आता यश दयालला कधीही अटक होऊ शकते.

न्यायाधीश अलका बन्सल यांनी आदेशात म्हटले- प्रथमदर्शनी आरोपीला खोट्या आरोपांमध्ये गोवण्यात आले आहे, असे वाटत नाही. आतापर्यंतच्या तपासात आरोपीचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे दिसून येते. आरोपीची चौकशी होणे बाकी आहे. अशा परिस्थितीत या टप्प्यावर आरोपीला अटकपूर्व जामिनाचा लाभ दिला जाऊ शकत नाही.

'२३ जुलै २०२५रोजी जयपूरच्या सांगानेर सदर पोलीस ठाण्यात यशविरुद्ध क्रिकेटमध्ये करिअर घडवण्याचे आमिष दाखवून आणि भावनिक ब्लॅकमेल करून अल्पवयीन मुलीवर अडीच वर्षे बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल झाला होता.

पीडितेच्या मोबाईलमध्ये चॅट, फोटो आणि व्हिडिओ सापडले पीडितेचे वकील दिवेश शर्मा यांनी सांगितले की, गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी पीडितेच्या आणि आरोपीच्या मोबाईलची सीडीआर (उऊफ) जप्त केली. यात दोघांमध्ये संभाषण झाल्याची पुष्टी होते. यासोबतच पीडितेने सांगितलेल्या हॉटेल्समध्ये दोघे थांबल्याची नोंदही आहे.

पीडितेच्या मोबाईलमधून मिळालेल्या चॅट, फोटो आणि व्हिडिओच्या विश्लेषणातून आरोपीविरुद्ध पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल होतो. त्यांनी कोटार्ला सांगितले की, आरोपीने ३-४ मे २०२३ रोजी जयपूरमध्ये आयपीएल सामना खेळत असताना पीडितेला रेल्वे स्टेशनजवळच्या हॉटेलमध्ये भेटायला बोलावले आणि लैंगिक संबंधांसाठी सांगितले.

## शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| १२७ | ५७९ | १६७ | १६० | १२० | १४० | २७७ | १३५ |
| २८० | २२७ | ३३६ | ३४० | ३०० | २५८ | ७९० | ३६० |
| ५६९ | ३३५ | २२० | ८९० | २२७ | ३४८ | ४५७ | ५६८ |

| जोडी | जोडी |
|---|---|
| ०२ - १२ - ४६ - ७६ | ३१ - ५१ - ६० - ९० |
| ०५ - १३ - ४९ - ७९ | ३७ - ५७ - ६४ - ९४ |
| ०८ - १८ - ४३ - ७३ | ३८ - ५८ - ६२ - ०२ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २६ डिसें. २०२५

## शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५

**सर्व बाजार साठी**

२१ - ६१ - ५० - ९०
२४ - ६४ - ५८ - ९८
२७ - ६७ - ५३ - ९३
---------------------
११० - ३५८ - २६७ - २३४
५८९ - २७७ - ३४८ - ९००
६७९ - ११४ - ४५६ - १८०

सर्व बाजारासाठी

| गुरू. ते शनि. ओपन डे | | | | | | गुरू. ते शनि. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३८ | | ११२ | | १६९ | | ७०० | | २३५ | | ६८९ | |
| २४६ | २ | २२० | ४ | २६८ | ६ | २५० | ७ | ३७० | ० | ७७९ | ३ |
| ३९० | | ३४७ | | ३६७ | | १६० | | ४६० | | ५९९ | |

| गुरू. ते शनि. क्लोज डे | | | | | | गुरू. ते शनि. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७० | | ५७८ | | ११५ | | १५८ | | १६८ | | १७८ | |
| ३६९ | ८ | २८० | ० | ४४९ | ७ | ३४७ | ४ | ३४८ | ५ | ३५८ | ६ |
| ५६७ | | ३७० | | २७८ | | ७८९ | | २३० | | २४० | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
४ ० २ १ ८

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**

## आजचे राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस आनंदाची बातमी घेऊन येईल. एखादी नवीन संधी तुमची वाट पाहत आहे. मित्राच्या मदतीने मोठ्या संस्थेत काम करण्याची संधी मिळू शकते. ज्यामुळे आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**वृषभ :** हवामानातील बदलांमुळे होणाऱ्या आजारांपासून सावध राहा. खर्च वाढल्याने आणि कौटुंबिक समस्यांमुळे मानसिक ताण जाणवेल.

**मिथुन :** आज तुम्हाला जाणवेल की तुमच्या आयुष्यात कुटुंबातील सदस्यांचे विशेष महत्त्व आहे. तुम्हाला अशा कार्यक्रमाहून एक महत्त्वाचे आमंत्रण मिळू शकते ज्याची तुम्ही कधीही कल्पना केली नसेल.

**कर्क :** आज तुमच्या संपत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. तुम्ही मित्रांसोबत बाहेर फिरायला जाण्याची योजना आखाल. तुमच्या आरोग्यात काही प्रमाणात चढ-उतार होतील. तळलेले पदार्थ खाणे टाळावे.

**सिंह :** विद्यार्थ्यांनी त्यांचा अभ्यास उद्यापर्यंत पुढे ढकलू नये; जेव्हा जेव्हा तुम्हाला मोकळा वेळ मिळेल तेव्हा तो पूर्ण करा. नवीन विषयांमध्ये तुमची आवड वाढेल. शिक्षकांकडून पाठिंबा मिळेल.

**कन्या :** आज नवीन काम सुरू करताना काही अडचणी येऊ शकतात. कुटुंबातील सदस्याचे आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. नोकरीत सहकाऱ्यांशी कामावरून वाद होऊ शकतात.

**तुळ :** आज तुम्ही काम आणि कौटुंबिक संबंधांमध्ये संतुलन राखाल. एखादे काम पूर्ण करण्यासाठी तुम्ही नवीन मार्गांचा विचार कराल. ऑनलाइन बिझनेस करणाऱ्या व्यावसायिकांना यश मिळेल.

**वृश्चिक :** कर्क राशीच्या लोकांना आज जीवनशैलीत काही बदल करावे लागतील. कार्यक्षेत्रात बदल करणे तुमच्या हिताचे ठरेल. एखाद्या खास व्यक्तीच्या भेटीमुळे तुमची रखडलेली कामे मार्गी लागतील.


**धनु :** नोकरी करणाऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल. काही प्रयत्नांनंतर मालमत्तेशी संबंधित समस्या सोडवल्या जातील. तुमचे तुमच्या नातेवाईकांशी चांगले संबंध निर्माण होतील.

**मकर :** आर्थिक सुधारणा होईल. अधिकाऱ्यांशी संबंध चांगले राहतील, मात्र कुटुंबातील कोणाचे तरी आरोग्य बिघडू शकते. आज तुम्हाला गरजू व्यक्तीला मदत करण्याची संधी मिळेल.

**कुंभ :** आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने सामान्य राहील. कार्यक्षेत्रात यशाचे योग आहेत. भागीदारासोबत नवीन व्यवसाय सुरू करण्याची योजना आखाल. ज्यात यश मिळेल.

**मीन :** आज सकारात्मक रहा, तुमच्या कामावर लक्ष केंद्रित कराल नाहीतर नुकसान होईल. आज तुमच्या भौतिक सुखसोयी वाढतील. ऑनलाइन व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या उत्पन्नात वाढ होईल.

## शब्दकोडे क्रमांक २३०७



**आडवे शब्द :-**
१) कमळ
३) नीच मनुष्य
६) फुरसद, संधी, मोका
८) उघड उघड
९) खोडातील द्रव
११) आगबोट
१२) चाणक्यनीती
१५) केस
१६) किंमत
१७) करमणूक
१८) चांगली वागणूक
२१) कशा प्रकारच्या
२२) लक्ष्मी
२४) प्रत्येक दिवशी
२६) उमर
२७) रेशमी धोतर
२८) दूर करणारा
३०) विहीरीतून पाणी काढण्याचे भांडे
३२) केर
३४) भक्कम, मजबूत
३६) पोते, गोणपाट
३९) गाय
४०) नवरदेव
४२) नेहमी
४३) गौरव
४४) हार, सर
४६) कुठल्या बाजूस
४८) नवरा
४९) पुरणे (जमिनीत)
५०) गवंडी
५२) जळलेले पीक
५३) शीळाच्या विरुद्ध
५४) अकस्मात
५६) बशीच्या बरोबरचे साधन
५९) एक रंगीत कंदमूळ
६०) उलट, विरुद्ध
६२) दार
६३) रांग, ओळ (हिंदी)

**उभे शब्द**
१) समाजात सुधारणा करणारा
२) म्हातारपणामुळे त्रासलेला
३) धर्माने युद्धात उच्चारलेले दोन अर्थाचे वाक्य
४) ढीग
५) जखमेवर लावायचा बाम
७) फावला वेळ
१०) शंकरावे एक नाव
१२) प्रामाणिक
१३) भेदणारा
१४) प्रत्येक वर्षी
१९) क्षमा
२०) पती-पत्नी
२३) नशा आणणारा
२५) धाक, भीती
२८) आधार नसलेला
२९) वेदनेने ओरडणे
३०) उदर
३१) व्यापार, व्यवसाय
३३) अतर्क्य गोष्ट घडणे
३५) हात
३७) सुंदर तरुणी
३८) घसा
४३) एक तारवाद्य
४४) नारळाचं झाड
४५) अनाचार
४७) कीर्तनकार
४८) फिरणे
४९) गवगवा
५१) लोक
५४) आगळेवेगळे
५५) काव्य
५७) पडणे, ऱ्हास
५८) निवासस्थान
६१) पंख

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# सिसिआयच्या पैशावर बँकांचा डल्ला?

## शेतकऱ्यांच्या तक्रारींनी खळबळ | 'शिवसेना स्टाईल' आंदोलनाचा इशारा

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.25)-** जिल्ह्यात सीसीआय (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) मार्फत शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या कापसाच्या रकमेवर बँकांकडून थेट कर्जाच्या नावाखाली डल्ला मारल्या जात असल्याचा प्रकार केल्या जात आहे. ज्यामूळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचे आधार कार्ड ज्या बँकेशी लिंक आहे, त्या बँकांकडून सीसीआयने जमा केलेली रक्कम थेट कर्ज खात्यात वर्ग केल्याचा आरोप पीडित शेतकरी करत आहेत. या प्रकरणामुळे जिल्हाभरात खळबळ उडाली असून, प्रशासनाकडून तातडीच्या निर्णयाची मागणी होत आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी संबंधित तक्रारींची दखल घेत जिल्हाधिकारी आणि अग्रणी बँकेच्या जिल्हा व्यवस्थापकांची भेट घेतली. यावेळी निवेदन सादर करून, शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय सीसीआयची रक्कम, अनुदान किंवा कोणतेही शासकीय पैसे थेट कर्ज खात्यात वर्ग करण्याची पद्धत तत्काळ थांबवावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.



बँकांनी अशाप्रकारे जबरदस्तीने वसुली सुरूच ठेवली तर संबंधित अधिकाऱ्याला 'शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ', असा थेट आणि स्पष्ट इशारा युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी दिला. शेतकऱ्यांचे पैसे कर्जात वळवल्यानंतर त्यांचा परतावा देण्यास बँका टाळाटाळ करत असल्यास, पीडितांनी 9921757180, 9421757180 या क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा, असे आवाहनही केले आहे.

# आरोग्याला धोका; भेसळयुक्त तेल बाजारात

## अन्न व औषधी विभागाचे दुर्लक्ष

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी (दि. 25)** – शहरासह परिसरातील बाजारात भेसळयुक्त खाद्यतेलांची सर्रास विक्री सुरू असल्याने नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या गंभीर बाबीकडे अन्न व औषध विभागाकडून अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

बाजारात विविध नामांकित कंपन्यांच्या ब्रँडच्या नावाखाली खाद्यतेलांचे डबे खुलेपणाने विक्रीला येत आहेत. मात्र, यामध्ये भेसळयुक्त तेलांचा समावेश असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अशा तेलांच्या सेवनामुळे दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवण्याची शक्यता असूनही, अन्न भेसळ विभागाकडून नियमित तपासणी व नमुना संकलन होत नसल्याची चर्चा आहे.

अकोला मार्केटमधून मोठ्या प्रमाणावर खाद्यतेलांचे डबे अंजनगाव सुर्जी शहरात आणले



जात असून, त्यांची प्रयोगशाळा तपासणी न होताच विक्री केली जात असल्याचे निदर्शनास येत आहे. विशेषत: सोयाबीन तेलाच्या नावाखाली भेसळयुक्त तेलांची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे बोलले जात आहे.

नागरिकांनी अन्न भेसळ विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून बाजारातून खाद्यतेलांचे नमुने गोळा करावेत व ते प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठवावेत, अशी जोरदार मागणी केली आहे. वेळेत कारवाई न झाल्यास जनतेच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# बळीराजा योजनेची गती वाढणार?

## पांदण रस्त्यांच्या कामांचा आमदार प्रवीण तायडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार,(दि.25) –** अचलपूर विधानसभा मतदारसंघातील पांदण रस्ते कामे गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी आमदार प्रवीण तायडे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (24 डिसेंबर) आढावा बैठक घेण्यात आली. मुख्यमंत्री बळीराजा शेत/पांदण रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसंबंधी हा आढावा घेण्यात आला.



शेतापर्यंत सुलभ रस्ता उपलब्ध होणे म्हणजेच शेतकऱ्यांच्या प्रगतीचा मार्ग सुकर होणे. ग्रामीण भागातील समृद्ध शेती, सक्षम पायाभूत सुविधा आणि सर्वांगीण विकासाला चालना देणे हा या योजनेचा प्रमुख हेतू आहे, असे आमदार तायडे यांनी बैठकीत स्पष्ट केले. सुरू असलेली तसेच प्रस्तावित कामे, त्यांचा दर्जा, अडचणी आणि नियोजित कालमर्यादा याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीस अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत आरखराव, अचलपूर व चांदूर बाजारचे तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच संबंधित विभागीय प्रतिनिधी उपस्थित होते. रस्ते कामांमध्ये गुणवत्ता राखणे, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेल याची दक्षता घेणे आणि सर्व विभागांनी परस्पर समन्वयातून काम करावे, अशा सूचना आमदार तायडे यांनी प्रशासनाला दिल्या. ग्रामीण क्षेत्रातील पांदण रस्ते सुदृढ झाल्यास शेतकऱ्यांचे उत्पादन, वाहतूक आणि बाजारपेठेतील पोहोच सुलभ होऊन आर्थिक उन्नतीस हातभार लागेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# रहमान नगरमध्ये अवैध शस्त्र जप्त

**अमरावती, (दि. 25)** – नागपुरीगेट पोलिसांनी रहमान नगरमध्ये छापा टाकून एका घरातून अवैध शस्त्रांचा साठा जप्त केला. या कारवाईत चार तलवारी, एक लोखंडी डंड्याचा फरशा व दोन स्टीलचे चाकु मिळून आले. जप्त शस्त्रांची किंमत 9,200 रुपये आहे. ही कारवाई 25 डिसेंबर रोजी करण्यात आली.गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी आमिन खान व आशिक खान (23, रहमान नगर, टॉवर लाईन, अमरावती) यांच्या घरावर पंचांच्या उपस्थितीत छापा टाकला. तलाशीदरम्यान अवैध शस्त्र जप्त करण्यात आले.

## नामदेवराव गेडाम यांचे निधन

**वरुड-** उमरखेड येथून शिक्षक म्हणून सेवेला सुरुवात करून ग्रामीण शिक्षणाची पायाभरणी करणारे आदर्श शिक्षक नामदेवराव गेडाम (वय) यांचे दु:खद निधन झाले. खडका येथे दीर्घकाळ प्रामाणिक सेवा बजावताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. शिस्त, प्रेम व समाजभान यांचा संगम असलेली त्यांची अध्यापनशैली विशेष ठरली. बारगाव येथून 2008 मध्ये निवृत्तीनंतरही ते समाजकार्यात सक्रिय होते. त्यांच्या जाण्याने परिसरात शोककळा पसरली आहे.



# नवनिर्वाचित नगरसेवक हर्षल वाघ यांना जीव घेण्याच्या धमक्या

## चांदूर रेल्वे पोलिसांत गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,(दि.25) –** नगर परिषद निवडणुकीत प्रभाग क्र. 4 (अ) मधून अपक्ष उमेदवार हर्षल अशोकराव वाघ विजयी झाल्यानंतर त्यांना जीवघेण्या धमक्या मिळाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. 21 डिसेंबर 2025 रोजी निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर वाघ समर्थकांकडून शहरात अभिनंदनाचे बॅनर लावण्यात आले होते. मात्र मध्यरात्री सिनेमा चौक परिसरात लावलेल्या बॅनरपैकी काही बॅनर फाडण्यात आले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्वरूप रोडे (रा. आझाद चौक) सहित काही युवक सहभागी असल्याचे दिसून आले, अशी माहिती वाघ यांनी दिली.



वाघ यांचा आरोप आहे की, पराभव पचवू न शकलेल्या काही विरोधकांकडून निवडणुकीपूर्वी प्रचारादरम्यान 'मारून टाकू', 'कापून टाकू', 'गाडीने उडवून देऊ' अशा धमक्या देण्यात आल्या होत्या. विजयानंतरच्या मिरवणुकीदरम्यानही शिवीगाळ व धमक्यांचा सिलसिला सुरूच राहिला.

या प्रकारामुळे शहरातील शांतता व कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण झाला असल्याचे वाघ यांनी म्हटले आहे. वाघ यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेनुसार कलम 351(3), 324(2), 352 अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरू आहे. 'माझ्या व कुटुंबाच्या सुरक्षेला धोका असून कोणताही अनिष्ट प्रकार घडल्यास त्याला विरोधक जबाबदार राहतील,' असा इशारा हर्षल वाघ यांनी दिला.

# माजी महिला सरपंच यांची गळफास घेऊन आत्महत्या

महासागर | प्रतिनिधी

**दर्यापूर, (दि. 25)** दर्यापूर तालुक्यातील गायवाडी ग्रामपंचायतीच्या माजी महिला सरपंच यांनी आपल्या निवासस्थानी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना गुरुवारी (दि. 25 डिसेंबर) दुपारच्या सुमारास उघडकीस आली. नारायणनगर येथील त्यांच्या घरात ही घटना घडताच परिसरात नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. अलका प्रमोद साखरे (वय 51) असे मृतक महिलेचे नाव आहे. त्या गायवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सलग पाच वर्षे कार्यरत होत्या.



गुरुवारी दुपारी घरात कोणीही नसताना सुमारे तीन वाजताच्या सुमारास त्यांनी बेडरूममध्ये छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलीस ठाण्याचे पीएसआय हरिहर गोरे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. प्राथमिक तपासानंतर मृतदेह सायंकाळी उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. मृत अलका साखरे यांच्या पश्चात पती, एक मुलगी व एक मुलगा असा परिवार आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# मोर्शीत आर्थिक तणावातून मजुराची आत्महत्या

## लोखंडी पाईपवर घेतला गळफास

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी (दि. 25)** – मोर्शी लगतच असलेल्या श्रीक्षेत्र पाळा येथील मोलमजुरी करणाऱ्या 28 वर्षीय युवकाने 25 डिसेंबर रोजी सकाळी 9 वाजताच्या सुमारास घरातील छताच्या लोखंडी पाईपला दोरीचा गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न करून आपले जीवन संपवले. मृतक युवकाचे नाव कमलेश पंढरी कडू (वय 28 वर्षे, रा. पाळा) असून, तो आपल्या वृद्ध आई व भावासोबत राहत होता. पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, कमलेश पंढरी कडू मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हाताळणीची असून, बेरोजगारी व व्यसनाधीनतेमुळे त्याने टोकाचा निर्णय घेतला. घटनेची माहिती गावातील पोलीस पाटील यांनी मोर्शी पोलीस स्टेशनला दूरध्वनीवरून दिली. मृतकाचा भाऊ प्रकाश कडू यांनीही पोलिसांकडे फिर्याद दिली. मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज साबळे यांनी घटनास्थळी जाऊन मृतदेह खाली उतरवले आणि शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिला. मोर्शी पोलीस स्टेशनने घटनेची नोंद करून संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल केला.

# असंतोषाची ठिणगी; अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदतनिधीचा तुटवडा

- त्वरित निधी वितरणाची मागणी व आंदोलनाची चेतावणी
- लोकविकास संघटनेचे आमदार तायडे यांना खुले पत्र

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार,(दि.25) –** चांदूर बाजार तालुक्यातील अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या हजारो शेतकऱ्यांना शासनाने मंजूर केलेला मदतनिधी अद्याप मिळाला नसल्याने असंतोष उसळला आहे. या तातडीच्या प्रश्नावर लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल मधुकरराव भालेराव यांनी अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रविण तायडे यांना खुले पत्र देत लक्ष वेधले आहे.

भालेराव यांनी पत्रात नमूद केले की, सुरुवातीला अनेक पात्र शेतकऱ्यांना व्ही.के. नंबरच देण्यात आला नव्हता. लोकविकास संघटनेच्या 'हल्लाबोल' आंदोलनानंतरच हे नंबर जारी झाले. त्यानंतर शासन निर्देशांनुसार सर्व पात्र शेतकऱ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली असतानाही, आजपर्यंत त्यांच्या खात्यात मदतनिधी जमा झालेला नसल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. बियाणे, खत, औषधे खरेदी करण्यासह घरखर्च भागविण्यासाठीही पैसे नसल्यामुळे कर्जबाजारीपणात वाढ होत असून शेतकऱ्यांची स्थिती बिकट झाली आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आमदारांनी शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहून ठोस भूमिका घेण्याची अपेक्षा असताना या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना निर्माण झाल्याचेही पत्रात नमूद आहे. या प्रकरणात त्वरित हस्तक्षेप करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात मदतनिधी जमा करण्याची मागणी संघटनेने केली असून, तोडगा न निघाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.



# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचे वारे

## इच्छुकांची धावपळ, नेत्यांभोवती गर्दी वाढली

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती( दि.25) –** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची चाहूल लागताच राजकीय वातावरण तापू लागले असून गावागावात निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. उमेदवारीचा विचार करणाऱ्या इच्छुकांनी तयारीला वेग दिला आहे. मतदारांशी जवळीक वाढवण्यासाठी कुणी शेत जेवणांच्या माध्यमातून जनसंपर्काची सुरुवात केली आहे, तर कुणी सोशल मीडियावर सक्रिय होत स्वत:ची प्रतिमा उजळविण्याच्या प्रयत्नात आहे. काही उमेदवारांनी देवदर्शनाची वारी सुरू करत, 'ईश्वरकृपेने विजय मिळेल' अशी श्रद्धा व्यक्त करत असल्याचे दिसून येते.



निवडणूक जवळ येत असल्याने स्थानिक नेत्यांच्या भोवती गर्दी वाढू लागली आहे. उमेदवारीचा तिकीट मिळावे, आशीर्वाद लाभावा यासाठी भेटीगाठींचे सत्र सुरू आहे. त्यात नातेवाईक व परिचितांमध्येही चर्चांना उधाण आले असून, काही ठिकाणी नातेवाईकांनीही तिकीटासाठी दावे-महत्वाकांक्षा व्यक्त केल्याने नेत्यांची बिकट परिस्थिती निर्माण होत आहे. कोणावरही पक्षपातीपणाचा ठपका येऊ नये, म्हणून अनेक नेते सावध भूमिका घेताना दिसत आहेत. त्यामुळे 'आपल्यामधला कोण खरा दावेदार?' हा प्रश्न राजकीय विश्लेषकांसमोर निर्माण झाला आहे. दरम्यान, काही पक्षांमध्ये अंतर्गत नाराजी पृष्ठभागावर येऊ लागली आहे. इच्छुकांना अपेक्षित महत्त्व न मिळाल्यास पक्षांतराची शक्यता नाकारता येत नाही. विविध राजकीय पक्षांत ये-जा, चाचपणी व गुप्त चर्चांना वेग आला असून, योग्य संधी मिळताच कट्टर समर्थकदेखील नवीन पर्यायांचा विचार करीत असल्याचे संकेत मिळत आहेत.

### सर्व काही मतदारांच्या हातात

एकूणच, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी दिवसेंदिवस रंगत असून पुढील काळात राजकीय समीकरणांमध्ये उलथापालथ होण्याची दाट शक्यता आहे. स्थानिक पातळीवरील स्पर्धा अधिक चुरशीची होणार असल्याचे चित्र स्पष्ट आहे. मतदार कोणाला विश्वासाची शिक्कामोर्तब करतील, याची उत्सुकता मात्र वाढतच चालली आहे.

## सिमेंट मिक्सर पलटी; कामगाराचा जागीच मृत्यू

**अमरावती –** चिखलदरा तालुक्यातील घटांग शिवारात सिमेंट मिक्सर मशीन उलटल्याने कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना 23 डिसेंबर रोजी उघडकीस आली आहे. या प्रकरणी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 20 नोव्हेंबर रोजी सायंकाळी सुमारे 6 वाजताच्या सुमारास घटांग शिवारात, मुख्य रस्त्यापासून सुमारे 30 किलोमीटर अंतरावर ही घटना घडली. ट्रॅक्टरला जोडलेली सिमेंट मिक्सर मशीन नेत असताना मशीनला जोडलेली लोखंडी पिन तुटली. त्यामुळे सिमेंट मिक्सर मशीन अचानक उलटली.

# महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर गॅन्ट्री बसविण्यासाठी वाहतूक तात्पुरती बंद

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 25) –** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिमअंतर्गत गॅन्ट्री उभारणीचे काम हाती घेण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (एमएसआरडीसी) कि.मी. 104+080 ते कि.मी. 120+300 या दरम्यान, धामणगाव रेल्वे व चांदूर रेल्वे तालुक्यातील परिसरात हे काम करण्यात येणार आहे. सदर काम दि. 27 डिसेंबर ते 29 डिसेंबर 2025 या कालावधीत पाच टप्प्यांत पूर्ण केले जाणार आहे.



प्रत्येक टप्प्यात गॅन्ट्री बसविताना संबंधित वाहिनीवरील वाहतूक 45 ते 60 मिनिटांकरिता पूर्णत: थांबविण्यात येणार आहे. काम पूर्ण होताच त्या टप्प्यातील वाहतूक पुन्हा सुरळीत सुरू केली जाईल, असे महामार्ग प्रशासनाने स्पष्ट केले आहे. कामाच्या नियोजनानुसार 27 डिसेंबर रोजी नगरगावंडी व नगरगावंडो परिसरात मुंबई वाहिनीवर दुपारी 2 ते 4 या दरम्यान, 28 डिसेंबर रोजी नागपूर वाहिनीवर नगरगावंडी येथे दुपारी 2 ते 4 या वेळेत, तर 29 डिसेंबर रोजी टिटवा येथे नागपूर व मुंबई वाहिनीवर वेगवेगळ्या वेळेत वाहतूक थांबविली जाणार आहे. महामार्ग वापरणाऱ्या वाहनचालकांनी प्रवासाचे नियोजन पर्यायी मार्गांचा विचार करून करावे व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# भक्तिमार्ग

## सकारात्मक दृष्टिकोन हवा

**स्वसाह्य**

आसपासच्या निराशाजनक वाता- वरणात मनात आशा बाळगणं अत्यंत कठीण मानलं जातं. पण हे जग आशेवरच चाललं आहे. उद्या चांगलं काही तरी घडेल, या आशेवर आपण जगतो. आयुष्यातला प्रत्येक क्षण, प्रत्येक प्रसंग आशेचे नवे किरण घेऊन येतो. सकारात्म क दृष्टिकोन किंवा आशा बाळगण्यासाठी काही वेगळं करण्याची गरज नसते. छोट्या-छोट्या गोष्टींमधून आपण आशादायक चित्र निर्माण करू शकतो. याविषयी...

* देवाचं सगळ्यांवरच प्रेम आहे आणि तो सगळ्यांसाठी उपलब्ध आहे. विधात्याचं हे प्रेम वैश्विक आहे. आपण सगळी त्या परमेश्वराची लेकरं आहोत आणि याच समान धाग्याने सगळे मानव एकमेकांशी जोडले गेले आहेत. प्रेम या भावनेबाबत असाच वैश्विक दृष्टिकोन बाळगायला हवा. आसपास असणाऱ्या प्रत्येकाबद्दल मनात प्रेम असलं पाहिजे. यामुळे इतरांकडून असणाऱ्या अपेक्षांचं प्रमाण कमी होईल. इतरांबद्दल मनात प्रेमभाव निर्माण होईल आणि आपण तणावमुक्त होऊ शकतो.

* काही गोष्टी सोडून द्यायला शिकायला हवं. आपले तात्विक मतभेद होऊ शकतात. वाद होऊ शकतात. पण त्याच गोष्टी मनात धरून जगू नये. अप्रिय घटना विसरून पुढे जायला हवं.

* आयुष्यात घडणाऱ्या छोट्या गोष्टींमधून आनंद मिळवण्याचा प्रयत्न करा. आयुष्यात सगळं खूप मोठं असलं पाहिजे असं नाही तर छोट्या गोष्टीही आनंद देऊ शकतात.

* प्रत्येक प्रसंगाला सामोरे जा. काही गोष्टी, घटनांमधून तुम्हाला बरंच काही शिकता येईल. तर काही घटनांमधून तुम्हाला जीवन- चा आनंद मिळू शकेल. आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक चांगल्या वाईट गोष्टीचा स्वीकार करा.



* वर्तमानावर लक्ष केंद्रित करा. आज काय करायचंय ते ठरवा. आजच्या प्रयत्नांमधूनच उद्याचा सुंदर भविष्यकाळ निर्माण होत असतो. त्यामुळे वर्तमानाला महत्त्व द्या. भूतकाळात रमणं, दुखद प्रसंगाचं स्मरण करुन दुःखी होणं टाळा.

* दुसऱ्याला काही तरी देत रहा. आनंद वाटत रहा. देवाठायी आनंदाचा महासागर आहे. तो प्रेम वाटत आहे, असा विचार करा. दररोज सकाळी उठल्यानंतर परमेश्वराचं स्मरण करा. त्याला धन्यवाद द्या. यामुळे निसर्गातली सकारात्मकता तुमच्यापर्यंत पोहोचेल.

---

## शुभंकर होवो जगणे

**भक्ती विशेष**

**स्वाती पेशवे**

नूतन वर्षानिमित्त सगळीकडे उत्साह जाणवत आहे. पूर्वी वर्षारंभाचा इतका उत्साह, इतकं भव्य साजरीकरण दिसत नसे. पूर्वी वर्षारंभाचा इतका उत्साह, इतकं भव्य साजरीकरण दिसत नसे. मग तो चैत्र शुद्ध प्रतिपदेचा दिवस असो वा १ जानेवारीचा. पण आता हे दोन्ही वर्षारंभ डोळे दिपतील अशा झगम गाटात साजरे होतात. गुढीपाडव्याला शोभायात्रांचा दिमाख वाढतोय, मंदिरा- तील चेंगराचेंगरी वाढतीये तर ३१ डिसेंबरला रस्त्यावरील उत्साहाला उधाण येतंय. साजरीकरणाला हे विराट आणि विशाल स्वरुप येण्यामागची नेमकी कारणं कोणती, इतक्या सकारात्मकतेने नववर्षाचं स्वागत होत असेल तर वर्षभरात बहुतांश नकारात्मक घटनाच का कानावर येतात, या दोन दिवसांमध्ये येणारा भावनांचा महापूर उर्वरित ३६४ दिवस न टिकता संवेदनशीलचा दुष्काळ कसा देऊन जातो या प्रश्नांची उत्तरं मात्र मिळत नाहीत. आपण जुन्या दिनदर्शिकेची गुंडाळी करतो. त्याजागी कोरी करकरीत दिनदर्शिका विराजमान होते. आधीच्या पानावरुन पुढे सुरू... या पद्धतीने नवा वर्षातील प्रवास सुरू होतो. पण आपण नव्या पानावरुन पुढे जातो तेव्हा भूतकाळाचं भिरुड सोबतच असतं. ते उतरत नाही तर पकड अधिक घट्ट करतं. म्हणजेच एक दिवस आभासी आनंदात घालवल्यानंतर पूर्वस्थिती पुन्हा आपला कब्जा घेते आणि 'नव्याचे नऊ दिवस' या संकल्पनेला मूठमाती देत अगदी दुसऱ्या दिवशीपासूनच नवलाईची जागा नेहमीची व्यवधानं व्यापतात. हे टाळायचं तर आधीच्या पानावरुन पुढे न जाता आधीचं पान पूर्णपणे मिटून, प्रसंगी फाडून पुढे जाण्याचं धोरण अवलंबायला हवं. आशा, आकांक्षा, भावना, उद्दिष्ट, स्वप्न, उमेद हे आणि यासारखे सगळे शब्द भविष्यकाळाशी निगडीत असतात. भूतकाळाशी त्यांचा काहीही संबंध नसतो. बरेचदा भूतकाळाच्या गर्भी निराशा, अपमान, प्रतिशोध, नैराश्य, चिंता आणि व्यथा यांचीच भूतं दडलेली असतात. भूतकाळात अनुभवलेले सुखाचे क्षण पाऱ्यासारखे उडून जात असतात आणि आठवणींच्या सांडपाण्यावर नेहमीच नकारात्मक विचारांचं गदळ तरंगताना दिसतं. या परीघासवे नव्या वर्षाला सामोरे जाणं म्हणजे हौदभर पाण्यात अत्तराचा एखादा थेंब टाकण्यासारखं असतं. या सुगंधाचा केवळ आभास निर्माण होतो, परिणाम दिसत नाही. तद्वतच मनातील नकारात्म कता बलपूर्वक दडवून ठेवत, मद्याच्या अंमलाखाली वृत्तींना चकवा देत साजरा केलेला सोहळा क्षणिक समाधान देणारा ठरतो. त्याचे तरंग उमटत नाही आणि पसरतही नाहीत. म्हणूनच या तरंगांवर लहरण्याची इच्छा असणाऱ्यांनी आधी मनसरोवर स्वच्छ आणि नितळ करायला हवं. अशा निर्मळ म नातच नवसंवेदनांचं स्वच्छ आणि सुंदर प्रतिबिंब पडू शकेल.

**आशावाद हा माणसाचा स्थायी भाव आहे. उद्याचा दिवस काही चांगलं घेऊन येईल या आशेवरच माणूस जगत असतो. जगण्यावरील नितांत प्रेम, विधात्यावरील गाढा विश्वास आणि अपार श्रद्धा असेल तरच आशावाद जिवंत राहतो. अशाच आशावादासवे आपण नूतन वर्षाला सामोरं जाऊ या. भविष्यात उदरात शुभघटकांची मालिका आहे. दररोज त्यातील एक घटना समोर येवो आणि आयुष्य शुभंकर आणि सुखकर होवो ही कामना...**



सध्याचा काळ अस्थिरतेने भारलेला आहे. दररोजचा दिवस एक आव्हान बनून समोर येत आहे. माणूस सशाच्या काळजाने त्याला सामोरा जात आहे. अनेकांबाबत घडलेले दुर्धर प्रसंग कधीही आपल्या आयुष्यातही घडू शकतात ही अनामिक भीती माणसाच्या अंतर्मनाचा एक खण व्यापून उरली आहे. म्हणूनच एकीकडे भविष्याप्रती आशावाद असताना दुसरीकडे या अनामिक भीतीची छायाही येणाऱ्या दिवसांवर दिसते. एकीकडे रात्रीच्या गर्भात उद्याचा उषःकाल असतो, असं म्हणत आपण स्वतःची समजूत घालत असलो तरी ही साशंकता पिच्छा सोडत नाही. म्हणूनही असेल कदाचित आपण भविष्याप्रती अधिक सजग आणि सावध झालो आहोत. ही अतिसावधता, भीती आपल्या विचार आणि आचारांवर परिणाम करत आहे. येऊ शकणाऱ्या संभाव्य संकटांचा सामना करण्यासाठी स्वतःला सुसज्ज करताना आपण अधिक आक्रमक, हिंसक आणि आक्रस्ताळे होत आ- होत. उद्याप्रतीची अशाश्वतता आणि असुरक्षितता आपल्या जगण्याचा गाभा कुरतडत आहे.

भविष्याचं चित्र नेहमीच भूताच्या आरशातून पाहिलं जातं. त्याकडे पाहताना पूर्वग्रह निश्चित असतो. याकारणानेदेखील भविष्याबाबत आशा कमी आणि भीती जास्त अशी आजची आहे. पुलावरील चेंगराचेंगरीत हकनाक गेलेले जीव, नैसर्गिक आपत्तींमध्ये जीव गमवावे लागणारे निष्पाप चेहरे, तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने नेणारा जगा- तील दोन सणकी राष्ट्राध्यक्षांचा प्रवास, अस्वस्थ आणि कुरापतखोर शेजार, केवळ आपल्याच नव्हे तर दुसऱ्याच्या चुकीचा भार पेलावा लागण्याची आजची अगतिकता या आणि अशा अनेक घटना, वार्ता आणि वास्तवाचे साक्षीदार असल्यामुळे खडा मारताच पशूंची काया थराथरावी तद्वतच एखादी अप्रिय घटना आपल्याला भयशंकित करुन जाते. संकटांची ही टांगती तलवार सध्या प्रत्येकाच्या डोक्यावर आहे. त्यामुळे अनुभवण्याची कमी आणि भोगण्याची वृत्ती वाढत आहे. पण भविष्याचं सोनेरी रूप बघायचं तर या वृत्तीचा त्याग करायला हवा. तरच प्रत्येक दिवसात समाधान गवसेल.

---

## गुणगौरव नरदेहाचा

**दासबोधातून...**

ईश्वरापर्यंत पोहोचण्यासाठी प्रवास करताना वाटेत येणारा अडथळा म्हणजे नरदेह असं म्हणून अनेक संतांनी नरदेहासंबंधी तिटकारा उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे. नरदेह अनेक दुःखांचं मूळ कारण असून देहाचे लाड पुरवणं हे पाप असल्याचं काहींच्या बोलण्यातून व्यक्त होतं. मात्र समर्थ रामदास नरदेहाचं म्हणजेच मनुष्यदेहाचं गुणवर्णन करतात. इतकंच नव्हे तर त्याला वंदनही करतात. यावेळी ते म्हणतात,




या नरदेहाचेनि आधारें। नाना साधनांचेनि द्वारें। मुख्य सारासारविचारें। बहुत सुटलें। या नरदेहाचेनि संमंधे। बहुत पावले उत्तम पदे। अहंता सांडून स्वानंदे। सुखी जाले।

येथे श्रीसमर्थ म्हणतात, चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या प्रवासानंतर मनुष्यजन्म प्राप्त होतो आणि तो प्राप्त होणं हीसुद्धा भाग्याची गोष्ट आहे. मनुष्य आणि इतर पशु, पक्षी, प्राणी यांच्यात मोठा फरक आहे तो बुद्धिम त्तेचा. माणसाकडे असणारी बुद्धी इतरांकडे नाही. त्या बुद्धीची सुबुद्धी करावयाची की दुर्बुद्धी हे माणसाच्या हातात आहे. हा मनुष्यदेहच नसेल तर बुद्धीही नाही, आणि असं असताना सद्बुद्धी तरी कुठून येणार? भक्ती आणि साधना कुठून येणार? असं असताना परब्रह्माचा विचार तर करायलाच नको. म्हणून नरदेह प्राप्त होणं हीच पूर्वजन्मीचं पुण्य फळाला आल्याची खूण आहे असं समर्थ सांगतात.

नरदेह लाभल्यामुळेच आपण भक्ती करु शकतो. जप, तप, तीर्थाटन, पुरश्चरण, नामस्मरण, हरीकीर्तन, योगाभ्यास, वेदाध्ययन, ग्रंथपठण हे सर्व साधनामार्ग केवळ मनुष्यजन्म आहे म्हणूनच आपण अनुसरु शकतो. ही अपूर्व उपलब्धी नरदेहामुळेच प्राप्त होते. ती सत्कारणी लावून, साधनामार्ग चोखाळून आपली उन्नती साधण्याचा मार्ग सापडतो. अनेकांना जलसिद्धी, वाचनसिद्धी वायुसिद्धी आदी सिद्धी प्राप्त होतात. मात्र या सिद्धी म्हणजे परब्रह्म नव्हे हेदेखील लक्षात ठेवलं पाहिजे असं समर्थ सांगतात.

---



## चोर झाले तुलसीदासांचे शिष्य

**आत्मबोध**

संत तुलसीदासांच्या आयुष्यात घडलेल्या एका घटनेतून प्रत्येकाला काहीतरी बोध घेता येईल. ही घटना अशी की, एकदा प्रवास करत असताना तुलसीदासांना काही चोर भेटले. तुम्ही कोण आहात, असं चोरांनी त्यांना विचारलं. 'बंधूंनो, जे तुम्ही आहात तोच मी आहे,' असं उत्तर तुलसीदासांनी दिलं. यामुळे हे चोरच आहेत, असं चोरांना वाटलं. 'या कामात नवखा आहेस असं दिसतंय, आमच्यासोबत चल,' असं एका चोराने त्यांना म्हटलं. तुल- सीदास त्यांच्यासोबत निघाले. त्यांनी चोरी करण्यासाठी एका घराची निवड केली आणि तुलसीदासांना बाहेर उभं राहून लक्ष ठेवायला सांगितलं. चोर घरात घुसले. यानंतर लगेच तुलसीदासांनी झोळीतून शंख बाहेर काढला आणि तो जोरात फुंकला. घाबरून चोर बाहेर आले. तुलसीदासांच्या हातात शंख बघून, हे का वाजवतो आहेस, असा प्रश्न केला. 'कोणी दिसलं तर आम्हाला सांग, असं तुम्हीच मला सांगितलं होतं. मला सगळीकडे प्रभू राम दिसू लागले आहेत. म्हणून मी शंख वाजवत आहे' असं तुलसीदासांनी त्यांना सांगितलं.

देव तुला कुठे दिसला, असा प्रश्न चोरांनी विचारल्यावर 'तो सगळीकडे आहे. जळी, स्थळी, पाषाणी तो आहे. देव कुठे नाही तेवढं विचारा,' असं उत्तर तुलसीदा- साने दिलं. या क्षणीही मला सगळीकडे राम दिसत आहे, असं ते म्हणाले. तुलसीदासांचं उत्तर ऐकून चोर समजायचं ते समजले. हा कोणी चोर नाही तर संत महात्मा असल्याची जाणीव त्यांना झाली.

चोरांनी तुलसीदासांचे पाय धरले. चोरीचा मार्ग सोडण्याचा निर्णय घेतला आणि त्यांचं शिष्यत्त्व पत्करलं. संतांच्या संगतीत चोराचं मनपरिवर्तन व्हायला वेळ लागत नाही, हेच यावरून दिसून येतं.

---

## अहंकार तो त्यागावा

**धर्मशास्त्रातून...**

अनेकांच्या मनात आपल्या ताकदीबद्दल अहंभाव असतो. या अहंभावामुळे विवेक, नम्रता सगळं काही बाजूला पडतं. अशा लोकांना आयुष्यात अनेक अडचणींना समोरं जावं लागतं. महाभारतातल्या एका प्रसंगातून आपण ही बाब समजून घेऊ या.



वनवास काळात पांडव द्रौपदीसह वनात भटकत होते. याच काळात ते कैलास पर्वताजवळील जंगलात पोहोचले. कुबेरही कैलासावर रहात होता. कुबेराच्या नगरीतल्या सरोवरात कमळाची सुंदर फुलं फुलत असत. या कमळांचा गंध द्रौपदीपर्यंत पोहोचला. यामुळे ती मोहीत झाली. तिने पांडवांना कमळं आणून देण्याची विनंती केली. भीमाने ही जबाबदारी स्वीकारली. कमळं आणण्यासाठी जात असताना वाटेत एक वानर आडवं झोपलं असल्याचं त्याला दिसतं. वानराची शेपटी रस्त्यात पसरली होती. अशाप्रकारे एखाद्या जीवाला ओलांडून जाणं योग्य नसल्याने भीमाने वाानराला शेपटी हटवण्याची विनंती केली. पण वानराने त्याचं ऐकलं नाही. यामुळे भीमाला खूप राग आला. 'मी महाबली भीम आहे,' असं तो म्हणाला. 'एवढा बलवान आहेस तर मग तूच माझी शेपूट बाजूला कर आणि निघून जा,' असं वानराने सांगितलं.

भीमाने त्याची शेपटी बाजूला करण्याचा खूप प्रयत्न केला. पण शेपटी तसूभरही हलेना. भीमाला खूप आश्चर्य वाटलं. अखेरीस त्याने वानरापुढे हात जोडले. तेव्हा ते वानर मूळ रूपात प्रकट झालं. साक्षात हनुमान भीमापुढे उभे ठाकले. आपल्या बळाचा अहंकार बाळगू नये. बळासोबतच नम्र भाव असणं महत्त्वाचं असतं हे या छोट्याशा घटनेतून हनुमानाने दाखवून दिलं. अहंकाररहित माणूस महान बनतो, असं हनुमानाने भीमाला सांगितलं. अहंकारामुळे सगळं मातीमोल ठरतं, हेच या घटनेवरून आपल्याला कळतं. हा संदेश लक्षात घ्यायला हवा.

---

## कृष्णवेडी मीरा

**जाणून घ्या**

संत मीराबाई श्रीकृष्णाची परमभक्त होती. तिने आयुष्यभर श्रीकृष्णाची भक्ती केली. मृत्यूनंतर ती श्रीकृष्णाच्या मूर्तीमध्ये सामावली असंही मानलं जातं. म ीराबाईविषयी जाणून घेऊ या.

* मारवाडमधल्या कुडकी नामक गावात १५५८ मध्ये मीराबाईचा जन्म झाला होता. मीरेच्या आईने खेळता खेळता एकदा श्रीकृष्णाच्या मूर्तीसोबत तिचं लग्न लावून दिलं. यामुळे मीरेने श्रीकृष्णाला सर्वस्व अर्पण केलं. आयुष्यभर त्याची भक्ती करत राहिली.

* कुटुंबीय आपल्याला श्रीकृष्णाची भक्ती करू देत नसल्याबद्दलचा संदेश मीराबाईने संत तुलसीदासांपर्यंत पोहोचवला होता असं म्हणतात. तिने श्रीकृष्णप्राप्तीच्या उपायांबाबत तुलसीदासांकडे विचारणा केली. त्यांच्या सांगण्यावरून मीरेने रामाची भजनंही लिहिली. 'पाये जी मैंने



रामरतन धन पायो' हे मीराबाईने लिहिलेलं रामाचं लोकप्रिय भजन आहे.

* इच्छेविरूद्ध मीराबाईचं लग्न भोजराजाशी लावण्यात आलं होतं.

* १५८० मध्ये तिच्या पतीचा मृत्यू झाला. यानंतर तिने संन्यास घेतला. पांढरी वस्त्र परिधान करून साधूसंतांप्रमाणे राहू लागली.

* पतीच्या मृत्यूनंतर मीर्रा कृष्णभक्तीत रममाण झाली. ती तासनतास कृष्णाच्या मूर्तीसमोर भजनं गाई. ही कृष्णभक्ती तिच्या कुटुंबीयांना आवडत नसे. त्यामुळे त्यांनी तिला विष देऊन मारण्याचा प्रयत्न केला.

* श्रीकृष्णाच्या भक्तीत तल्लीन असतानाच तिने मृत्यूला कवटाळलं असं म्हटलं जातं. १६३० मध्ये ती कृष्णाच्या मूर्तीत सामावली अशी आख्यायिका सांगितली जाते.

* पूर्वजन्मी मीराबाई वृंदावनातली गोपी होती. तिथल्याच एका गवळ्याशी तिचा विवाह झाला. पण श्रीकृष्ण विरहाच्या दुःखात तिने प्राणत्याग केला होता.

---



## जबलपूरचं पचमठा मंदिर

**तीर्थक्षेत्र**

देशात लक्ष्मीची विविधं मंदिरं आहेत. प्रत्येक मंदिराचं एक वैशिष्ट्य आहे. मध्य प्रदेशातल्या जबलपूरमध्येही लक्ष्मीचं असंच एक मंदिर आहे. पचमठा या नावाने ते आ- ळखलं जातं. या मंदिरात लक्ष्मीबरोबरच विविध देवीदेवतांची पूजा होते. राधा- कृष्णाच्या विशेष उत्सवाचंही इथे आयोजन केलं जातं. मंदिरातील लक्ष्मीची मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. दिवसातून तीन वेळा मूर्ती रंग बदलते असं भाविक सांगतात. सकाळी देवीची मूर्ती पांढऱ्या रंगाची दिसते. दुपारी पिवळी आणि संध्याकाळी निळ्या रंगाची दिसते. लक्ष्मीच्या मूर्तीचे बदलते रंग पाहण्यासाठी अनेक जण गर्दी करताना दिसतात.

अमावस्येला या मंदिरात भक्तांची बरीच गर्दी होते. मंदिर गोंडवाना राजांच्या काळात बांधण्यात आलं होतं. राज्याचा विशेष सेनापती दिवाण अधार सिंह यांच्या नावे असणाऱ्या तलावात ते उभारण्यात आलं होतं. मंदिराच्या चारही बाजूंना श्रीयंत्र बसवण्यात आली आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत या स्थानी मोठ्या संख्येने तंत्रविद्येचे उपासक येत असत. ते इथे उपासना करत असत. साधारण ११०० वर्षांपूर्वी मंदिराची स्थापना करण्यात आली असल्याचं जाणकार सांगतात. सूर्याची पहिली किरणं देवी लक्ष्मीच्या पायांना स्पर्श करतात. हे दृष्य अत्यंत देखणं दिसतं.

इथे दर शुक्रवारी भक्तांची खूप गर्दी होते. या दिवशी माता लक्ष्मी भाविकांच्या इच्छा पूर्ण करते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे पचमठा मंदिरातल्या लक्ष्मी देवीवर भाविकांची प्रचंड श्रद्धा आहे.

---

## श्रीविष्णूची पूजा करताना...

**मंत्रजागर**

विष्णूला जगाचा पालनकर्ता म्हटलं जातं. गुरूवारी विष्णूपूजन करण्याचं मोठं महत्त्व सांगितलं जातं. या दिवशी गुरूरूपात विष्णूची पूजा केली जाते. दर गुरूवारी सकाळी स्नान करून विष्णूच्या आराधनेला सुरूवात करावी. विष्णूच्या प्रतिमेला आंघोळ घालून पूजन करावं. मंत्रांचा जप करून धूप, दीप आणि कापूराने आरती करावी. द्वादशी, पौर्णिमा, एकादशी या तिथींना विष्णूची पूजा करणं अधिक लाभदायी समजलं जातं. विष्णूशी संबंधित काही मंत्र आहेत. या मंत्राच्या जपाने पूजनाचे सर्वाधिक लाभ मिळतात. या मंत्रांविषयी...

* श्रीविष्णूचा मंत्रजप म नोभावे करायला हवा. या मंत्रांमध्ये विष्णूची महती वर्णन करण्यात आली आहे.

॥ श्री विष्णु मूल मंत्र ॥

ॐ नमो नारायणाय । ॐ नमो भगवते वासुदेवाय ।

* ओम नमो नारायणाय, ओम नमो भगवते वासुदेवाय।

* ओम नारायणाय विद्महे, वासुदेवाय धीमहि, तन्नो विष्णू प्रचोदयात हा विष्णू गायत्री मंत्र आहे.

* श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे। हे नाथ नारायण वासुदेव । हा विष्णूचा श्रीकृष्ण अवतार मंत्र आहे.



* विष्णूरूपाचं पूजन करताना शांताकारम, भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं। विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगम। लक्ष्मीकांतम कमल नयनं योगिभिध्यान नगम्य। वन्दे विष्णूं भवभयहरं सर्वलौकेननाथम। या मंत्राचा जप करावा.

* हातात तुळशीमाळ घेऊन श्रीविष्णूच्या मंत्रांचा जप करावा. एक, तीन, पाच किंवा अकरा वेळा माळ जपून मंत्रजप करावा.

